' ॥ जैसा भाव तैसा जवळी त्या दुरी ॥

म्हणजे मग माहीम ते खोदादाद सर्कलपर्यंत पालखी नको, तर तिथेंच जागच्या-जागींच जिथें असाल तिथेंच ॥ ' तुका म्हणे हरी देतो घेतो ॥ ' म्हणजे काय, एक भाव, एक ध्यान, एक दिल, एक चित्त करून पांडुरंगाला पहा म्हणजे मग माझा पंढरीनाथ---

॥ हांसतसे शिव्या देतां त्या गौळणी ॥ मरतां जपध्यानीं न बोले तो ॥ १ ॥

यज्ञयागजपतप, पूजाअर्चा, उत्सव, तिथी यांमध्यें मरणाऱ्या साधकांपेक्षां माझ्या देवाला भोळ्या भावाच्या गौळणीच आवडतात.

॥ बैसोनी निवांत करीन चिंतन ॥ काय–वाचा–मनसहित देवा ॥ धृ ॥

॥ नामाचा आठव हेंचि सोपें वर्म ॥ अवघें कर्माकर्म पारुषाति ॥ १ ॥

॥ यापरतें साधन आन कांहीं नेणें ॥ अखंड वाचें म्हणे रामकृष्ण ॥ २ ॥

॥ सुलभ हा मंत्र तारक जिवासी ॥ येणें भवासी उतार होय ॥ ३ ॥

॥ चोखा म्हणे मज सांगितलें कानीं । रामकृष्ण वाणी जपसदा ॥ ४ ॥

आपण बाजारांतून कसली तरी एक मूर्ति विकत आणतों; ती निर्जीव व गुण-रहित असते; पण तिच्या प्राणप्रतिष्ठेबरोबर कोणत्याही देवाचें नांव घेऊन तिचें बारसें करतात. एकदां का प्राणप्रतिष्ठा झाली कीं, ती मूर्ति सजीव होऊन त्या देवाचे गुण तिच्यामध्यें आपोआप येतात हा सिद्धांत आहे–॥ हरिपण हरिनामें धातुमूर्तीस आलें ॥ किंवा ॥ शिळ्या तांब्याचें बाहुलें केलें ॥

॥ पाषाणाचें नांव ठेवियेलें देव ॥

॥ आणिका तारी भाव परि तो तैसा ॥

आपल्या या मुंबईत आपणांला हें कदाचित् दिसणार नाहीं पण आपण जर कोंकणांत गेलांत, तर गोवारी, गुराखी अगर राखण्या किंवा जांगळी यांनीं एखादा दगड देव म्हणून पूजायचा. कुठें ? शेतांत, रानांत आणि हा असला राखण्यांनीं पुजलेला दगड पुढें नवसाला पावतो. याबद्दल कुणाही कोंकण्याला विचारलेंत तर तो तुम्हांला स्वतःचे अनुभव ऐकविल. आतां सांगा ? शेतांतला दगडच ना तो ! मग हें असें कां व्हावें ? बापहो, निष्कपटी, निःस्वार्थी भावानें गुराख्यांनीं केलेली दगडाची ही पूजा सरळ माझ्या विठोबारायाच्या चरणीं रुजू होते, आणि मग ॥ सत्यदेव माझा भोळा परमेश्वर ॥ न मोडी उत्तर संत आज्ञा ॥ तो दीनदयाघन प्रभू भक्तवत्सल कृपाळू परमेश्वर भक्तजनांच्या काजासाठीं अठ्ठाविस युगें विटेवर तिष्ठत उभा रहाणारा पांडुरंग भक्तिभावाच्या मोजमापावर हांकेसरशी उडी घालून, आणि खऱ्या भावानें, खऱ्या श्रद्धेनें शब्द उच्चारणाऱ्या भाविकाचा शब्द, आज्ञा म्हणून वरच्चेवर झेलून धरतो, इतकेंच नव्हे तर तात्काळ खरें करून दाखवितो. हा माझा पांडुरंग परमात्मा फक्त तुमचा भाव तेवढाच जाणतो. त्याच्याजवळ ' हे कोण भाऊसाहेब, व्या पुढें ध्या खुर्चि. ते कोण ! डॉक्टर, हे कोण कॉ... हे

कोण ! मिनिस्टर, आणि हे आपले सावकार. ' इथें परमेश्वराच्या ठिकाणीं तें कांहीं नाहीं हो. आमच्या बाबांच्या जवळ सतत सान्निध्यांत असणाऱ्या माणसाकडे जरा लक्ष्य टाकलेंत तर आपणाला हेंच दिसेल. नवकोट नारायण, श्रीमंत बुट्टी, टिळक वगैरे सारख्यांची वर्णी आमच्या बाबांच्याजवळ न लागतां जे जे खऱ्या भावानें, खऱ्या दिलानें परमेश्वराची सेवा करणारे बाबांचे झाले होते, खऱ्या भावानें, निःस्वार्थी प्रेमानें परमेश्वराला भजणारा, मग तो कुणीही असो त्याचें ॥ न पाहेची याती कुळ ॥ भक्तांची जात एकच असते. धर्म एकच असतो; आणि तो म्हणजे देवाचा भक्त असणें हाच. माझ्या पंढरीनाथाच्या भक्तप्रभावळीकडे नजर टाकलीत तर माझ्या या विधानाची सत्यता आपणाला पटेल. माझ्या पांडुरंगाच्या ठिकाणीं: माझ्या बाबांच्या ठिकाणीं फक्त तुमच्या अंतःकरणांतील भावाची परीक्षा. तुमचें हृदय, तुमचें मन, तुम्हीं त्यांना एकनिष्ठ भावानें अर्पण करा, ते तुमच्यासाठीं वाटेल तें करतील. विदूर दासीपुत्र, प्रल्हाद दैत्यपुत्र, रोहिदास चांभार, सजन कसाई म्हणजे खाटिक, चोखामेळा महार, नरहरी सोनार, कबीर मुसलमान, दादू पिंजारी, नामदेव शिंपी, मिराबाई, दामाजी, गोरोबा काका, आणि आमचे पुंडलिक महामुनि यांच्या भक्तिभावाला भुललेला परमेश्वर त्यांची जातपात विसरला आणि ढोरें ओढण्यापासून तो मांस विकण्यापर्यंत सगळीं, सगळ्या तऱ्हेचीं कामें त्यानें केलीं. तुमचा भाव शुद्ध असला पाहिजे. परमेश्वर—आमचे बाबा फक्त तेवढेंच पहातात. एरवीं तुम्हीं पूजा केली काय, मध फुलें वाहिलीं काय, प्रसाद वांटलांत काय, अगर देवापुढें आरास रोषणाई केली काय ? देवाचें तिकडे लक्ष्य नाहीं.

॥ देवासी तो पुरें एक प्रेम एक भाव, पूजा अर्चा वाव सर्वजाणा ॥ —एकनाथ

या सगळ्या प्रकारांत देव काय धुंडतो, देवाची चौफेर नजर काय हुडकते ! सांगा बरें. आणि जर का देवाच्या या परीक्षेंत तुम्हीं पास झालांत म्हणजे देवानें—माझ्या साईनाथानें, तुम्हांला जवळ केलेंच म्हणून समजा; मग तुम्हांला कशाचा तोटा ?

॥ अंगिकार ज्याचा केला नारायणें । निंद्य तेंही तेणें वंद्य केलें ॥
॥ अजामिळ, भिल्ली तारील कुंटीणी । प्रत्यक्ष पुराणीं वंद्य केली ॥
॥ ब्रह्महत्याराशी पातकें अपार । वाल्मीकी किंकर वंद्य केला ॥

दाखलेच द्यायचे झाले तर आपल्याला वाटेल त्या ग्रंथाचे वाटेल तें पान उघडलें असतां हवे तेवढे मिळतील.

॥ तुका म्हणे भोळा । स्वामी माझा कोंवळा ॥

खऱ्या अंतःकरणानें भक्तिभावानें परमेश्वराच्या चरणीं लीन व्हा, त्याला आळवा, त्याचें नामस्मरण करा.

" उठाउठी करा स्मरणाचा धांवा ॥ " आणि असे तुम्हीं एकदां करूं लागलात कीं मग—

" धरवत " देवा " नाहीं धीर " तुमच्या हांकेला धांवलाच माझा पांडुरंग.

म्हणजे देवाला, माझ्या बाबांना प्रेमबंधनांनीं बांधता येतें; पण तें प्रेमसुद्धां उगाच उद्धवकार नाहीं, तर त्याला तसा भाव लागतो.

|| प्रेम नुपजे भावावीण । भाव तेथें देव जाण ||
|| भावा पोटीं प्रेम पूर्ण । भावचि कारण भवतरणा ||

महिपतीकृत संतलीलामृत उघडलेंत तर त्या ग्रंथाचें पानन्पान तुम्हांला हेंच सांगेल कीं,

|| जपतप व्रतें अनुष्ठान । येथें भावचि मुख्य कारण ।
|| भावावांचोनी केलें अर्चन । तें दांभिक जाण व्यर्थची ||
|| वेदशास्त्रें पुराणें सकळ । भक्तिवांचूनी अवघें निष्फळ ।
|| तो तीर्थें हिंडला जरी सकळ । तरी भक्तिविणें फळ न येची ||

म्हणजे भाव पाहिजेच.

|| तुका म्हणे अवघें फिकें भावावीण ।
|| मीठ नाहीं अन्न तेणें न्यायें ||

यज्ञयागजपतपादींना न भुलणारा परमेश्वर–

|| पहा हो भुलला भक्तिप्रेमासी ।
|| शिदोऱ्या चोरूनी खाये वेगेसी ||
|| तिन्हीं त्रिभुवनीं ज्याची सत्ता आहे ।
|| तो चारी करीताहे घरोघरीं ||
|| वेदशास्त्रश्रुति कुंठीत पै होती ।
|| त्या गौळणी बांधती धरोनियां || —एकनाथ

प्रत्यक्ष परमेश्वरानें आपणाला सनद लिहून दिली आहे कीं "अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् || साधुरेव स मंतव्यः सम्यग्व्यवसितो हि सः || गीता, अ० ९ वा. ३० वा. श्लोक. म्हणजे मोठा दुराचारी मनुष्यही जर मला अनन्यभावें करून भजेल तर तो मुक्तच होतो.

अनन्य भाव म्हणजे परमेश्वराच्या ठिकाणीं ज्या चित्तवृत्तीचा पूणपणें लय झालेला असतो तो भाव. तसेंच

|| ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहम् || म्हणजे परमेश्वर सांगतात कीं जे मला जसे भजतात त्याप्रमाणें मी त्यांना भजतों.

यावरून आपण जरा मागें जाऊन गुराख्यांनीं पूजलेल्या दगडाबद्दल बोलूं या. आतां तोच शेतांतला, रानांतला दगड त्यावर देव समजून खऱ्या भक्तीनें त्याला भजल्यामुळें त्या दगडाला देवाची कळा येऊन तो दगड देव झाला. हें जें मिळणारें फळ तें त्या दगडाच्या प्रतिकाचें नसून त्या गुराख्यांच्या भावाचें आहे. सर्व कर्माचें फल देणाऱ्या सर्वसाक्षी परमेश्वराची दृष्टी भक्तांच्या अंतर्यामीं वसणाऱ्या भावाकडे असते. म्हणून तुम्हीं आम्हीं देखाव्यासाठीं दांभिकपणानें भक्ति न करतां खऱ्या भावानें करूं या; समर्थ श्रीसद्गुरु साईनाथ आपणांला त्यांच्याजवळ घेतलिच घेतील हा विश्वास धरा. निःस्वार्थी, निरपेक्ष आणि सद्भावना बाळगणाऱ्यांची,

परमेश्वराची सेवा करूं या परमेश्वर लांब नाहीं, बाबा लांब नाहींत. पांडवमाता कुंती जिच्याजवळ प्रत्यक्ष श्रीकृष्ण भगवान बोलत असत, तिला काय कमी होतें ! पण तिनें-ही सेवाधर्म श्रेष्ठ मानला आणि देवाजवळ मागणें काय मागितलें, आहे ठाऊक ! हत्ती, घोडे, दासदासी, पैसाअडका, राज्यधनसंपदा न मागतां—

॥ स्वधर्मफलनिर्दिष्टां यां यां योनिं व्रजाम्यहम् ॥
॥ तस्यां तस्यां हृषिकेश त्वयि भक्तिर्दृढाऽस्तुमे ॥

—पांडवगीता.

म्हणजे देवा, याच जन्मांत नव्हे पण जन्मोजन्मीं तुझी सेवा करण्याचा आशीर्वाद दे. आतां सांगा, संतजनहो, या भाउलीला त्या ब्रह्मांडनायकाजवळ दुसरें कांहीं मागतां येत नव्हतें का ? पण देणारा दाता भेटला तरी मागणाराला बुद्धी असावी लागते. क्षमा करा, मायबाप; पण इथें मला एक सांगणेंच क्रमप्राप्त झालें आहे. आणि तें म्हणजे काय, तर आमच्या बाबांकडे येणारे भक्त व त्यांचे प्रकार. कांहीं असे असतात कीं, देव आहे, दर्शन घडावें. फक्त हाच उद्देश. कांहीं असे कीं, कांहीं तरी आपल्याकडून घडावें म्हणून येणारे. कांहीं, पुढचा पळतोय् म्हणून स्वतः पळणारे. अर्थात विनाउद्देश. हा एक प्रकार. दुसरा प्रकार, निव्वळ स्वतःच्या नांवलौकिकासाठीं धडपडणारे; म्हणजे दांभिक भक्तीनें धडपडणारे. कित्येक, जन्माला आल्याचें कांहीं तरी सार्थक घडावें म्हणून धडपडणारे, तर कित्येक, बाबाकडून कांहीं मिळालें तर म्हणजे धनद्रव्य, पोरेंटोरें, गुरें-ढोरें, गाडीघोडा वगैरे पहावें म्हणून. कांहीं आमच्यासारखे परिस्थितीनें गांजल्यावर, स्मशानवैराग्य न्यायानें, बाबा पुढें रडणारे. तर कित्येक निव्वळ बाबांच्या दरबारांत, अगर देवाच्या उत्सवांत जमणाऱ्या बायकांच्या घोळक्यांतून एखादीचे डोळे आपल्याकडे लागले तर पहाण्यासाठीं हा मार्ग धरतात. असो. सांगण्याचें तात्पर्य हेंच कीं, या सगळ्या गोष्टी जेव्हां बाजूला सारून लीनतेनें परमेश्वरापुढें जाल तरच त्याची कृपा होण्याची शक्यता. तुम्ही भक्तिबंधनांत गुंतल्याशिवाय त्याला तुमच्याकडे पहायला फुरसतच नाहीं. वासना, भावना गुंडाळून—

॥ इंद्रियाचा जय साधुनियां मन ॥
॥ निर्विषय कारण असे तेथें ॥

जेव्हां तुम्ही निर्विकार होणार तेव्हांच्या या गोष्टी.

संत जनहो, अतिशय कडक आहे बरें का हें व्रत ! अतिजड आहे बरें का हें भक्तीचें खूळ ! !

याची जाणीव होऊनच कीं काय मायबाप संतसेना सांगताहेत कीं—

॥ असाल तेथें करा नामाचें चिंतन ॥
॥ याहुनी साधन आणिक नाहीं ॥
॥ सोडवील माझा भक्तांचा कैवारी ॥
॥ प्रतिज्ञा निर्धारी केली आम्हीं ॥

हा आम्हां संसारी जनासाठीं सांगितलेला सरळ आणि सोपा मार्ग; तर मग जर असें तर—

॥ अर्के चेन्मधुविन्देत किमर्थं पर्वतं व्रजेत् ॥

जवळच बसल्या जागींच जर मध मिळेल तर मधाचें पोळें शोधण्यासाठीं रानावनांत, डोंगरांत जाण्याचा खटाटोप कशाला ?

॥ नलगे सायास जावें वनांतरा ॥
॥ सुखें येतो घरा नारायण ॥

प्रत्यक्ष परमात्मा नारायण तुमच्या भावबंधनांत गुंतल्यावर जिथें तुम्ही तिथें तो हमखास आहेच म्हणून समजा. म्हणून आमचे संतसेना म्हणतात—

॥ एका भावावांचोनी । देव जोडे ऐसा नाहीं ॥ ध्रु० ॥

तेव्हां या सगळ्या गोष्टी जर घडवून आणायच्या असतील तर रस्त्यावर टांगलेल्या पाट्याप्रमाणें मार्गदर्शन करणारे कोणी तरी हवेच.

गुरु म्हणतात तें हेंच बरें.

॥ जयासी वाटे देव पहावा । तेणें सद्गुरु करावा ॥
॥ सदगुरुवीण देवाधिदेवा । पाविजेत नाहीं ॥

संत जनहो, काय सांगूं, काय बोलूं, अंतःकरण भरून येतें.

'अविभक्तं विभक्तेषु' या सात्विक ज्ञानदृष्टीनें सर्व धर्मातील ऐक्य ओळखून भक्तिमार्गातील खोट्या बंडाचा उच्छेद करणारे श्रीसंतसद्गुरु जर प्रथम कुठें उदयास आले किंवा त्यांनीं आपल्या मताचा योग्य व अधिकारी अनुयायी संच जर कुठें ठेवला, हें पाहूं गेल्यास, मायबाप, या आमच्या भरतभूमिकडेच बघावें लागेल; आणि त्यांतल्या त्यांत आमचा महाराष्ट्र. आमच्या महाराष्ट्रानें आम्हांला जें कांहीं दिलें आहे, जें कांहीं देत आहे त्यापुढें इतर जग तुच्छ आहे. सहजसुलभतेनें ईश्वरभक्ति कशी करवी, अगदीं सोप्या पद्धतीनें श्रीहरीची प्राप्ती कशी करून घ्यावी याबद्दलचा मार्ग आम्हां महाराष्ट्रीयांना आमच्या संतविभूतींनीं अगदीं सुलभ करून दिला.

॥ मार्ग दाऊनी गेले आधीं । दयानिधी संत पुढें ॥
॥ त्याच पंथें चालों आतां । न पडे गुंता कोठें कांहीं ॥—निळोबा.

निळोबारायासारख्या संत विभूतींनें आपणांला एवढी ग्वाही दिली आहे. म्हणजे आपण जर खरोखर खऱ्या मनानें परमेश्वराची आवड धरीत असूं, तर आपण श्रीसद्गुरूला शरण जाऊंया: कारण—

॥ भगवत्प्राप्ति व्हावया कारण । ऐसे इच्छिती साधक जन ॥
॥ ऐसें श्रेष्ठ कोणतें साधन । तरी सत्संग तेणें धरावा ॥ १ ॥
॥ जयास वाटे देव पहावा । तेणें सद्गुरु करावा ॥
॥ सद्गुरूवीण देवाधिदेवा । पाविजेत नाहीं ॥ २ ॥
॥ तीर्थमें फल एक है । संत मिले फल चार ॥
॥ सद्गुरु मिले अनेक फल । कहे कबीर विचार ॥ ३ ॥

॥ गुरुचरणीं ठेविती भाव । आपोआप भेटे देव ॥
॥ म्हणूनि गुरुसी भजावें । रुपध्यानासी आणावें ॥ ४ ॥
॥ देव गुरुपाशीं आहे । वारंवार सांगूं काये ॥
॥ तुका म्हणे गुरुभजनीं । देव भेटे जनीं वनीं ॥

॥ श्रीगुरुच्या पायीं ठेवी तूं विश्वास । दासांचा तूं दास होईं त्यांचा ॥
॥ राम परब्रह्म वसिष्ठा शरण । कृष्णें सांदिपनी गुरु केला ॥
॥ वाल्मीकी ऋषी नारद उपदेशी । त्रिभुवनीं धन्य वाल्या झाला ॥
॥ एकाजनार्दनी गुरु मज भेटला । मोकळा दाविला मार्ग तेणें ॥

श्रीसद्गुरूचा मोठेपणा इतका आहे, म्हणून भक्तजन हो, तुम्ही करीत असलेलीं इतर वावदूक साधनें सोडा आणि सद्गुरूच्या चरणीं लीन व्हा. परमेश्वर नक्की भेटेल. मात्र तुमची भावना पाहिजे. मन ध्यान सर्वस्वीं तद्रूप झालें पाहिजे तरच फलप्राप्ति.

॥ यन्मनसा ध्यायति, तद्वाचा वदति, यद्वाचा वदति, तत्कर्मणा करोति ।
॥ यत्कर्मणा करोति, तदभिसंपद्यते ॥ ( सत्यार्थ-प्रकाश, ईश्वर नाम व्याख्या )

म्हणजे, जीव मनानें ज्याचें ध्यान करतो, तें वाणीनें बोलतो; जसें वाणीनें बोलतो तसें कर्म करतो; आणि जसें कर्म करतो, तसें फल प्राप्त होतें.

एवढें सांगण्याचें कारण बाप हो, या भक्तिमाऊलीची, आमच्याच मायमाऊलीची कूस शिणवून जन्माला आलेले कांहीं मनुष्यप्राणी, विटंबना करीत आहेत, तिला अधर्मानें उपयोगांत आणून स्वतःचा चरितार्थ चालवितहेत. अगदीं कालचेंच ताजें उदाहरण घ्या. बुवा पकडले गेलेच ना अखेर. माहिमचे पळाले वसईला आणि गोरेगांवानें मौन पत्करलेलें आहे. मालाड पण हलूं लागलें आहे. ईश्वराच्या घरचा न्यायच सत्य आणि नित्य असा आहे. अधर्म चालणार किती दिवस !

॥ नाधर्मश्चरितो लोके सद्यः फलति गौरव । शनैरावर्तमानस्तु कर्तुर्मूलानि कृंतति ।
॥ अधर्मेणैधते तावत्ततो भद्राणि पश्यति । ततः सपत्नाञ्जयति समूलस्तु विनश्यति ।(मनु )

म्हणजे अधर्म जो आहे तो दुःख दिल्याशिवाय रहात नाहीं. अधर्माचरणाचें फळ तात्काळच मिळतें असें नाहीं. माझा पांडुरंग, माझा साईनाथ, फारच लीलालाघवी आहेत; तुमच्याकडून घडली जाणारी चूक अगर अधर्म, ते कांहीं काल सहन करतातच; आणि त्यामुळेंच अज्ञानी लोक अधर्म करण्यास भीत नाहींत. पण हें निश्चयानें जाणावें कीं, अधर्माचरण हळूहळूं सर्व सुखांचा नाश करीत असतें. अधर्म करणारा मनुष्य प्रथमतः धर्ममर्यादा सोडून, मिथ्या भाषण, पाखंड वगैरे करून, बाह्य देखाव्याचें दुकान मांडून, धनधान्य, ऐश्वर्य, खानपान, वस्त्र, मानप्रतिष्ठा वगैरे वाढवून घेतो. पण खरें बाहेर पडायची वेळा येतेच येते. आणि मग तोंड घेऊन तरी जावें लागतें; अगर होत असलेली फजिती मुकाट्यानें सहन करावी लागते. म्हणजे याला कारण काय ? तर सद्भक्तीचा अभाव. परमेश्वराच्या भक्तीबद्दल खरी आस्था, खरी कळकळ नसून, फक्त

पैसा व मोठेपणा यांच्या मागें लागणारे हे अधर्मी लोक, भोळ्या भाबड्या भाविकांची दिशाभूल करतात, आणि संतांचें कीर्तन, विद्वानाचें प्रवचन वगैरे भक्तीच्या मार्गाला तिलांजली देऊन सिनेमानटांचा सत्कार व नटींचें नर्तन असले कार्यक्रम त्यांच्यापुढें ठेवतात. पण अशा अधर्मी लोकांकरतां महाराजांनीं एका ठिकाणीं म्हटलें आहे—

॥ जयासी नावडे हरिनाम कीर्तन । आणिक नर्तन वैष्णवांचें ॥
॥ सत्य त्याच वेळे घडला व्यभिचार । मातेशीं व्यवहार अंत्यजाचा ॥

असो. सांगण्याचें तात्पर्य एकच कीं, बाबांच्या नांवाचें, परमेश्वराच्या नांवाचें कातडें पांघरूण, दांभिकपणानें भक्तीची चेष्टा न मांडतां, खऱ्या कळकळीनें, खऱ्या अंतःकरणानें ॥ मार्ग दाऊनी गेले आधीं । दयानिधी संत पुढें ॥ संतांनीं घालून दिलेल्या मार्गानेंच जाऊं या, त्यांतच सारें कांहीं आहे व मिळेल.

॥ भगवत्प्राप्ति व्हावया कारण । ऐसे इच्छिती साधक जन ॥
॥ ऐसें श्रेष्ठ कोणतें साधन । तरी सत्संग तेणें धरावा ॥

सत्संग तरी उगाच लाभेल का ? साधुसमागम तरी उगीच मिळेल का ?
नाहीं बरें, उगीच सहज मिळण्याइतकी ही गोष्ट सवंग नाहीं बरें !

॥ रवि रश्मीधरून, गगना जाऊं येईल, परी साधू न भेटेल भावाविण ॥ भावाशिवाय जिथें साधू भेटणे अशक्य, तिथें देवाची भेट कशी व्हावी ! रस्तोरस्तीं, गल्लीबोळांमधून, अगर देवळाच्या आसपास तांबडें फुटल्यापासून संध्याकाळीं पुन्हां पाण्यांत बुडेपर्यंत, बेंबीच्या देठांपासून, देवाच्या नांवानें ओरडणाऱ्या बुवाची– अगर भिकाऱ्याची म्हणा हवें तर–देवाच्या दरबारीं, मोक्षांत रवानगी व्हायला हवी, पण तसें न होतां, वर्षानुवर्षें त्याच्या कपाळींची भीक आणि ओरडणें सुटत नाहीं. आणि जीव जातां जातां मुलाच्या मिषानें नारायणाचें नांव घेणारा अजामिळ मुक्त होतो. असें कां व्हावें ? याला कारण–भाव म्हणून संतसेना म्हणतात– "एका भावावांचोनी कांहीं । देव जोडे ऐसा नाहीं ॥ यासाठीं परमेश्वराच्या ठिकाणीं भाव रहावा अशी इच्छा असेल, त्यानें पाहिल्यानें सद्गुरु–चरण धरावें; निरपेक्ष, निःस्वार्थी, निहतुकपणानें, एकभावानें, एकदिलानें, त्याची सेवा करावी यापेक्षां सोपा आणि सुलभ उपाय नाहीं बरें ! या भक्तीनें खुद्द परमेश्वर गीतेच्या अठराव्या अध्यायांतील पंचावन्नाव्या ओवींत सांगतात– " भक्त्या मामभिजानाति यावान्यश्चास्मि तत्त्वतः । ततो मां तत्त्वतो ज्ञात्वा विशते तदनंतरम् ॥ "

तात्पर्य काय परमेश्वराचें ज्ञान करून घ्यायचें असेल तर बुद्धि श्रद्धायुक्त घडली पाहिजे. आणि अशा बुद्धीनें, अशा भावानें सत्पुरुषाची, ज्ञानाची, सद्‌गुरूची सेवा घडली पाहिजे. नाहीं तर सारें फुकट. दोन वेळां स्नान करून, अंगाला भस्म माखून, गळ्यांत माळ घालून देवाची पूजाअर्चा केली, ज्ञानेश्वरी–भागवताचीं दासबोधाचीं पारायणें केलीं, उपासतापास केले, म्हणजे थोडक्यांतबोलायचें तरइंग्रजींत ज्यालामशिनवर्क म्हणजे यंत्र कसें एकदां गति दिल्यानंतर बंद करीपर्यंत चालू रहातें, त्याप्रमाणें या साधकाच्या या अशा सर्व क्रिया दांभिकपणामध्यें मोडतात. यांत परमेश्वराला जें पाहिजे नेमकें तेवढेंच नाहीं.

माझ्या माहितीचे एक डॉक्टर आहेत, ते भक्ति करतांना लोकांना दिसतील, उत्सव साजरे करतांना दिसतील, बहुरुप्याप्रमाणें सोंगें घेऊन कीर्तन करतांना दिसतील, स्वतःच्या कीर्तनाच्या गुपचूप जाहिराती करतांनाही कांहीं मोजक्या लोकांना दिसतील, गांठीला बांधून आणलेला पूर्वपुण्याचा ठेवा अजून शिल्लक असल्यामुळें पैसा भरपूर आणि दारीं मोटार त्याच्या जोरावर त्यांना हवें तें करतां येतें.

आणि म्हणूनच वर लिहिलेल्या सर्व उजेडांतल्या गोष्टी त्यांना जशा करतां येतात, तशा काळोखांतीलही कित्येक गोष्टी ते आपल्या कल्पनेप्रमाणें गुपचूप करतात. त्यांना वाटतें कीं, हें कोण पहाणार? कुणाला समजणार हें? पण हिरण्यकश्यपूनें लाथ मारतांच निर्जीव वाटणाऱ्या लांकडाच्या खांबांतून परमेश्वर बाहेर पडले हा दाखला डॉक्टर इतरांकरतां कीर्तनांतून देतात आणि स्वतःच्यासाठीं सवलतीनें विसरतात. जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं, इतकेंच नव्हे तर "सकल चराचर व्यापुनीयां जो दशांगुळें उरला ॥" त्या परमेश्वराला हें सहन न होऊन डॉक्टराला त्यानें उघड्यावर टाकला. अपील नाहीं. झाला डाक्टरांचा गाजावाजा.

संत मायबाप, हें लिहिण्यांत कुणाच्या उखाळ्यापाखाळ्या काढायचा माझा उद्देश नाहीं. जो उद्देश आहे तो इतकाच कीं, या अशा दांभिक लोकांच्या स्वैराचारी वर्तनामुळें भोळ्या भाबड्या माणसांची देवधर्मावरची श्रद्धा डळमळीत झाली. आणि खऱ्या भक्तिवान् श्रद्धावान माणसांची—संतसाधूंची टवाळी होऊं लागली, कुचेष्टा होऊं लागली, होतां होतां परमेश्वर हें निव्वळ काल्पनिक थोतांड आहे, त्या बुजगावण्याला भिण्यांत अर्थ नाहीं असें समजून त्याप्रमाणें वागण्यांत, अभक्ष्य भक्षण, स्वैराचार वगैरे करण्यांत माणसांनीं पुढची मजल गांठली. कै० गु० राम गणेश गडकऱ्यांचा वृंदावन परमेश्वर म्हणजे काय? तें स्पष्टच सांगतो.

हें एवढें कशामुळें झालें. खिळ्यासाठीं घोडेस्वार मेला म्हणजे डॉक्टरसारख्या दांभिक माणसांच्यामुळें इतर भोळ्याभाबड्या जनांनीं प्रत्यक्ष परमेश्वराच्या अस्तित्वाबद्दल शंका घ्यावी. असो. सांगण्याचें तात्पर्य हें कीं, अशा दांभिकपणानें परमेश्वराची सेवा न करतां खऱ्या अंतःकरणानें, खऱ्या भावानें करा. प्रल्हादासाठीं खांबांतून बाहेर पडणारा परमेश्वर तुम्हां आम्हां सर्वांबरोबर असून, आपल्याकडून होणाऱ्या प्रत्येक हालचालीकडे त्याचें पूर्ण लक्ष्य असतें. अध्यात्मविषयक बाबतींत बोलण्याची माझी पात्रता नाहीं, आणि ती कदाकाळीं येईल अशी माझी भक्ति पण नाहीं; कुटुंबांतील किडा झाल्यामुळें सेवाही होत नाहीं. असो. मात्र श्री. निरीखेकरांनीं श्रीसंत योगी गजानन महाराजांबद्दल लिहिलेल्या आत्मप्रभा नांवाच्या ग्रंथांत लिहिलें आहे तें देतों, आणि परमेश्वराचें अस्तित्व जगांतच नव्हे तर आपणांतही आहे हें आपणांला पटवून घेतां आलें तर पहाण्याची कामगिरी तुम्हांवरच सोंपवितों.

सायकलच्या टयब, रबरी चेंडू, फूटबॉल वगैरेमध्यें असलेली हवा घालविण्यास टांचणीनें पाडलेलें बारिक छिद्रसुद्धां पुरे होतें, पण आपल्या देहाला नव दरवाजे म्हणजे छिद्रें असतांना सुद्धां आंत खेळणारा वारा फुस्स करून जात नाहीं, काय बरें असावें हें!

असो. संत मायबाप, अतिशयोक्तीचें बोलणें नव्हे बरें, जें कांहीं मनाला वाटलें, बुद्धीला पटलें तें तुम्हांपुढें बडबडलों.

हें बडबडणें सुद्धां माझें नव्हेंच. "बोलविता धनी" आपणांला ठाऊक आहेच. तेव्हां संत सेना जें "एका भावावांचोनी कांहीं, देव जोडे ऐसा नाहीं" सांगतात तें माझे मायबाप तुम्हीं आचरणांत आणा, इतर कांहीं जवळ केलेलें असेल तर झटकन झाडून मोकळें व्हा—आणि मग "तुका म्हणे वसे भक्तभाव । तेथें नांदे देव संदेह नाहीं" असो.

"शेवटीं पायांच्या प्रसादें । कांहीं बोललों विनोदें ।। १ ।।
।। मज क्षमा करणें संतीं । नव्हे अंगभूत युक्ति ।। २ ।।
।। नव्हे हा उपदेश । तुमचें बडबडलों शेष ।। ३ ।।
।। तुमचे कृपेचें पोसणें । जन्मोजन्मीं तुका म्हणे ।। ४ ।।

असो. ज्या बाबांच्या कृपेमुळें मला एवढें लिहितां आलें, त्यांच्या चरणीं हा देह विनम्र करून इथेंच आटोपतें घेतों.

।। साईनाथ गुरु माझे आई । मजला ठाव द्यावा पायीं ।।
।। साईनाथ गुरु माझे आई । मजला ठाव द्यावा पायीं ।।
विठ्ठल, विठ्ठल, विठ्ठल, विठ्ठल, विठ्ठल, विठ्ठल.
पुंडलिकवरदे हरि विठ्ठल । श्रीज्ञानदेव तुकाराम
**पंढरीनाथ महाराजा की जय ।।**
**सच्चिदानंद श्रीसद्गुरु साईनाथ महाराज की जय.**

**—बाबांचा बाळ्या**

---

# —: शिर्डी—वृत्त :—

## माहे सप्टेंबर १९५०

बाहेरगांवचा व आजूबाजूचा पुष्कळ भक्तगण या महिन्यांत श्रींच्या दर्शनासाठीं येऊन गेला—कपडे व सोन्याचांदीचे जिन्नस २० भक्तांकडून देणगी दाखल आले.

**धर्मकृत्यः**—अभिषेक, आर्चन, लघुरुद्र, पूजा, आरती, नैवेद्य, ब्राह्मण सुवासिनी भोजन व अन्नदान वगैरे धर्मकृत्यें नेहमींप्रमाणें झालीं. तीन भक्तांनीं मंदिरांत श्री सत्यनारायणाच्या पूजा घातल्या.

**कीर्तन**—संस्थान गवई यांचीं ६ कीर्तनें या महिन्यांत झालीं. १ गोकुळअष्टमी—कृष्णजन्म, २ गोकुळअष्टमी—काला, ३ श्रावण व॥११, ४ अहिल्याबाई पुण्यतिथी, ५ गणेशचतुर्थी, ६ भाद्रपद शु. ११. बाहेरगांवचे श्री. ह. भ. प. गोपीचंदबुवा बोरकर, श्रीमती गंगाबाई देशमुख, नाशिक व श्री. ह. भ. प. स्वामी बाजीराव पाटील जाधव यांचीं श्रीमंदिरांत कीर्तनें झालीं.

**नवल विशेष**—श्रीकृष्णाष्टमीनिमित्त श्रींच्या रथाची मिरवणूक व गोपाळकाला झाला. श्री. पनवेलकर भजन मंडळींनीं संगीत भजनाचा कार्यक्रम केला. श्री. पिरोजबाई दस्तुर, मुंबई यांनीं श्रीपुढें संगीत भजन-गायन केलें. श्री. पुंडलिक सुपे, रहाता-सनई वादन; सभामंडपाचें बांधकाम चालू आहे. हवामान उत्तम आहे.

## माहे आक्टोबर १९५०

श्रीसाईबाबांच्या दर्शनास या मैहिन्यांत बाहेरगांवचे बरेच भक्त आले होते. पुण्यतिथीचा उत्सव या महिन्यांत असल्यानें भक्तांची तर विशेष गर्दी झाली होती.

या महिन्यांत सोन्या-चांदीचे व कापडाचे जिन्नस मिळून एकूण ५१ भक्तांकडून देणग्या आल्या.

**धर्मकृत्यं**—अभिषेक, अर्चन, पूजा, लघुरुद्र, नैवेद्य, आरती, ब्राह्मण सुवासिनी भोजन व अन्नदान वगैरे विधि संस्थानतर्फे रोज योग्य तऱ्हेनें केलें जात होतें. दोन-तीन भक्तांनीं मंदिरांत श्री सत्यनारायणाच्या पूजा घातल्या.

**कीर्तन**—संस्थान गवई यांचीं दोन कीर्तनें झालीं. १ भाद्रपद व॥११ व २ श्री पुण्यतिथी काला. बाहेरगांवचे कीर्तनकार ह.भ.प. भास्करबुवा [नाशिक], ह. भ. प. श्री. बा. देव [ठाणें], ह. भ. प. डॉ. बी. के. नाडकर्णी [ मुंबई ]; श्री. डॉ. के. भ. गव्हाणकर, [ कुर्ला ]; श्री. ह. भ. प. सदाशिव कृष्ण पुराणिक, [ आळंदीकर ] इत्यादि भक्तांचीं श्रीमंदिरांत कीर्तनें झालीं.

**नवलविशेष**—श्री. डॉ. स. बा. भट, पुणें [ गायन ]; श्री. बा. मा. लोंढे, नाशिक [ संगीत भजन ]; श्री. द. ना. सिन्नरकर, नाशिक [ संगीत भजन ]; सौ. नारंगीबाई साळगांवकर, मुंबई [ गायन ]; श्री. राममोहन शुक्ला मुंबई [ गायन ]; श्री. उमाप्रसाद साकोरी, [ भजन ], या भक्तमंडळीनें श्रीपुढें हजेरी देऊन श्रींसह जमलेल्या भक्तगणांचें मनोरंजन केलें. सभामंडप बांधकाम चालू आहे. हवापाणी उत्तम आहे.

---

# श्री पुण्यतिथि उत्सव

आधुनिक संतशिरोमणी श्री सच्चिदानंद सद्गुरु साईनाथ महाराज, संस्थान शिर्डी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर, यांचा पुण्यतिथि उत्सव आश्विन शु.॥ १० शके १८७२ शुक्रवार ता. २०-१०-१९५० पासून तीन दिवस शिरडी येथें झाला. ता. २२-१०-१९५० रोजीं गोपाळकाला होऊन उत्सव समाप्त झाला.

## —उत्सवाचा कार्यक्रम—

**शुक्रवार ता. २०-१०-१९५०.**

नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त गांवांतून सकाळीं भिक्षा-मिरवणूक निघाली होती. समाधीस भक्तांकडून पूजा वगैरे झाल्यानंतर मंगलस्नान घालण्यांत आलें. नंतर महापूजा व तीर्थप्रसाद झाला. संध्याकाळीं सीमोल्लंघनाचा कार्यक्रम होऊन रात्रौ रथाची मिरवणूक काढण्यांत आली व नंतर कीर्तन झाल्यावर शेजारती करण्यांत आली.

**शनिवार ता. २१-१०-५०.**

नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त श्रींचे समाधीस भक्तगणांकडून पूजा वगैरे करण्यांत आल्यानंतर गांवांतून भिक्षा-मिरवणूक काढली. नंतर समाधीचे मंगल स्नान झाल्यावर पुष्पार्पण, वस्त्रार्पण करण्यांत आलें.

दुपारीं श्रींचे चरित्रावर ह. भ. प. श्री. बा. देव, मु. ठाणें सन्माननीय ट्रस्टी श्री सांई संस्थान यांचें कीर्तन झालें. आराधनाविधीनंतर महापूजा आरती झाली व तीर्थप्रसाद देण्यांत आला. संध्याकाळीं ४ ते ७ श्रींच्या जुन्या कपड्यांचा लिलांव करण्यांत आला. रात्रौ श्रींचे पालखीची गांवांतून मिरवणूक काढण्यांत आली. त्यावेळीं गारूड व नकला करून दाखविण्यांत आल्या. नंतर शिरडी येथील श्रीसाईनाथ दिग्वीजय मंडळीनें "लक्षाधीश" या नाटकाचा प्रयोग करून दाखविला. नंतर रात्रभर श्रीमंदिरांत संगीत भजन, वांसरी, गायन सनईवादन करण्यांत आलें.

**रविवार ता. २२-१०-१९५०.**

नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त सकाळीं भक्तांकडून श्रींचे समाधीस पूजा करवून घेतल्यावर समाधीस मंगलस्नान घालण्यांत आलें. चि. अनिलकुमार ज. मोहिले, मुंबई यांनीं जलतरंग, तबला वगैरे संगीत कार्यक्रम करून दाखविले. नंतर कालाकीर्तन होऊन दहीहंडी फोडण्यांत आली, व महापूजा वगैरे होऊन तीर्थ-प्रसाद वांटण्यांत आला व उत्सव समाप्त झाला. संध्याकाळीं श्रींच्या जुन्या कपड्यांचा लिलांव करण्यांत आला. रात्रौ गांवांतील हौशी मंडळींनीं 'पिंगला' नाट्यप्रयोग करून दाखविला. तसेंच दुसरे दिवशीं मुंबईचे डॉ. नाडकर्णी यांनीं 'संत कबीर' कीर्तनरूपि नाट्यप्रयोग करून दाखविला. अशा तऱ्हेचा प्रयोग नवीनच आहे. नुसत्या कीर्तनांत लोकांस गोडी वाटत नाहीं. कीर्तनाची आवड उत्पन्न करण्यास असले नाट्यप्रयोग फारच उपयोगी पडतील.

कोजागिरी दिवशीं रात्रौ डॉ. गव्हाणकर यांचें कीर्तन, अभिषेक पूजा. श्री. द. ब. राणे संस्थानचे स. चिटणीस यांचे हस्तें चंद्रपूजा, अभिषेक पूजा होऊन सर्व मंडळीस दूध प्रसाद देण्यांत आला. नंतर कुर्ल्याचे साई भक्त डॉ. गव्हाणकर, श्री. हडकर, श्री. सामंत, श्री. वालावलकर, वगैरे मंडळींनीं रात्रभर भजन वगैरे कार्यक्रम करून जागर केला.

यंदाच्या उत्सवांत खालील कलाकार मंडळींनीं भाग घेतला होता.

| | |
|---|---|
| श्री. वसंत शामराव बोरकर, मुंबई | बांसरी वादन |
| ,, अनिल कुमार मोहिले ,, | जलतरंग |
| ,, गजानन पंडित, गवई | गायन |
| ,, दामूअण्णा बेलापूरकर | सनई-वादन |
| ,, रंगनाथ शिंपी | तबला |
| ,, हरी शिंपी | गायन |
| कु. कृष्णाबाई धुरंधर, मुंबई | गायन |
| श्री. डॉ. गव्हाणकर, कुर्ला | कीर्तन |

| | | |
|---|---|---|
| ,, स. गो. हडकर, | मुंबई | गायन |
| ,, नरसिंह सामंत, | ,, | तबला |
| ,, कृष्णराव वाघ, | ,, | भजन |
| ,, एस्. जी. वालावलकर | ,, | तबला |
| ,, सदाशिव पुराणिक | ,, | कीर्तन |
| ,, शंकरराव रहातकर | ,, | सनईवादन |
| ,, चव्हाण, | ,, | नकला व भजन |
| ,, डॉ. नाडकर्णी | ,, | कीर्तनरूप नाट्यप्रयोग |
| ,, पठाणभाई, शिरडी | | ' पिंगला ' नाट्यप्रयोग |
| ,, मधुकर | | ' लक्षाधीश ' नाट्यप्रयोग |
| ,, दाजीबा परब. | | नाट्यछटा |
| ,, बाबासाहेब नाईक | | |

उत्सवास संस्थानचे चिटणीस व खजिनदार, ट्रस्टी वगैरे मंडळींनीं स्वतः हजर राहून देखरेख केली. अशा रीतीनें उत्सव उत्तम प्रकारें पार पडला.

## माहे नोव्हेंबर १९५०

भक्तांची श्रींच्या दर्शनासाठीं येजा या महिन्यांत वाढलेलीच होती. या महिन्यांत ३७ भक्तांकडून श्री संस्थानास कपड्याच्या, सोन्याचांदीच्या वगैरे वस्तु आल्या आहेत.

**धर्मकृत्यें**—अभिषेक, पूजा, आरती, लघुरुद्र, ब्राह्मण-सुवासिनी भोजन, नैवेद्य अन्नदान वगैरे विधी नेहमींप्रमाणें करण्यांत येत होते.

**कीर्तन**—संस्थान गवयी यांची आश्विन व॥ ११ व कार्तिक शु. ११ अशा दोन कीर्तनें झालीं.

**नवल विशेष**—दिपवाळीनिमित्त समाधीस मंगलस्नान, श्री लक्ष्मीपूजन, दिपोत्सव, शोभेची दारू व संस्थान नोकर-सेवेकरी यांस चहा-फराळ देण्यांत आला. कार्तिक शु०॥ ११ निमित्त समाधीस मंगलस्नान झालें व गांवांतून पालखीची मिरवणूक काढली व कीर्तन झालें.

श्री. गणपतराव सुंबे पुणें शाहीर, श्री. रामचंद्र सावंत, श्री. नेमिनाथ दांड, श्री. रंगनाथ यादव, श्री. जनार्दन करंडे यांनीं पोवाडे-गायन उत्तम केलें.

श्री. पंढरीनाथ रा. गुर्जर, पुणें संगीत भजन, श्री. मेनका शिरोडकर, गायन व वसंत शिरोडकर-तबला, श्री. सखाराम अप्पा-हार्मोनियम अशी हजेरी दिली.

श्री. गोविंदबुवांनीं एकतारीवर भजनाची हजेरी दिली. श्री. जगन्नाथबुवा पंडित यांनीं गायन व श्री. पंडित भाग्य रेड्डी भोलाराम-कवाली भजन. श्री. लक्ष्मण घोंगडे कर्जत यांनीं संगीत भजन.

सभामंडपाचें काम चालू आहे. हवापाणी उत्तम आहे.

**सेक्रेटरी,** श्री साई संस्थान.

# कै. गोविंद विनायक वाड यांचें अल्प चरित्र

कै. गोविंद विनायक वाड यांचा जन्म १८९३ सालीं कुलाबा जिल्ह्यांतील तळें मुक्कामीं झाला. प्राथमिक शिक्षण कोंकणांतच झालें. त्यांची थोरली बहीण पश्चिम खानदेशांत होती म्हणून ते तिच्याकडे धुळ्याला गेले. तेथें दुय्यम शिक्षण संपल्यानंतर नोकरीसाठीं ते मुंबईस आले. वयाच्या १९ व्या वर्षी डहाणूचे कंत्राटदार कै. जनार्दन धोंडो करंदीकर यांच्या ज्येष्ठ मुलीबरोबर त्यांचा विवाह झाला. नोकरीसाठीं ते आसाम ओरिसामध्यें होते. तेथून दीड–दोन वर्षांनीं मुंबईस आले. तेथें तीन ते चार वर्षे राहिल्यानंतर त्यांची भुसावळला बदली झाली.

आमचे वडील, हे त्यांच्या तरुणपणीं फार नास्तिक होते, विशेषतः साधुमहाराजांवर अजिबात विश्वास नसे. आणि त्यांना जर कोणी अमुक हे महाराज चांगले आहेत, तुम्हीं तेथें जरूर जा वगैरे सांगितलें तर ते तो विषय पार उडवून लावीत. माझे आईचे वडील हे एक निस्पृह साईभक्त होते. ते शिरडीस जात असत. श्री साईबाबा प्रत्यक्ष असतांना माझे आजोबा आमच्या काकांना तेथें त्यांच्या दर्शनाला चलण्यासाठीं पुष्कळ आग्रह करीत असत. परंतु श्रीसाईबाबा फकिराचा वेष घालीत, मशिदींत राहात वगैरे गोष्टींनीं श्रीसाईबाबांविषयींचें आकर्षण त्यांच्या तरुण बुद्धीला होत नसे व ते म्हणायचे कीं "जर हे हिंदूंचे देव आहेत तर ते मुसलमानांच्या मशिदींत राहतात. 'अल्ला सबका ठीक करेंगा' असें म्हणतात. म्हणजे मग ते हिंदूंचे देव कसे ? म्हणून तर मी असल्या महाराजांच्या पाया पडण्यास अजिबात जाणार नाहीं." अन् काय योग, श्रीसाईबाबा हयात असेपर्यंत ते त्यांच्या दर्शनाला मुळींच गेले नाहींत.

कै. ति. काका असें म्हणून जरी त्यांच्या दर्शनाला गेले नाहींत तरी श्रीसाईबाबा त्यांना तसें मोकळें थोडेच सोडणार होते ? पण देव कांहीं उगीच दृष्टांत देत नाहीं, जणूं काय तो योग्य संधीची वाटच पहात असतो. माझ्या सर्वांत थोरल्या भावाच्या वेळेस आमच्या आईला त्रास होऊं लागला. आमच्या आईच्या माहेरीं सर्वजण साईभक्त असल्यानें तिनें सहाजिकच साईबाबांचा धांवा केला. माझे वडील त्या रात्रीं फार काळजींत होते. परंतु बाबांनीं योग्य मोका साधून, त्यांना दृष्टांत देऊन काळजींतून मुक्त केलें. आतां साईबाबांच्या प्रभावशक्तीबद्दल आश्चर्य वाटूं लागलें व त्यांच्या संपूर्ण देवपणाबद्दल खात्री झाली व त्यांनीं त्या घटनेनंतर श्रीसाईबाबांच्या दर्शनाला शिर्डीस जाण्याचें ठरविलें व रामनवमीला दर्शनाला गेलेही; परंतु श्रीसाईबाबा नुकतेच समाधिस्त झाले होते त्यामुळें त्यांना श्री बाबांच्या प्रत्यक्ष दर्शनाचा लाभ मिळाला नाहीं. परंतु त्या वेळेपासून ते वर्षांतून दोनदां व जमल्यास तीनदांही उत्सवास जाऊं लागले व आमच्या घरांत रोज पूजा होऊं लागली.

आम्हीं १९३९ सालीं मद्रासला जाण्याचें ठरविलें, सर्व तयारी झाली. गुरुवारीं सकाळीं कै. ति. काका कामावर जाण्यासाठीं निघाले असतांना घरापासून थोड्याच

अंतरावर दोन कुत्र्यांनीं त्यांच्या सायकलला ठोकर दिली व ते खालीं पडले. या अपघातांत त्यांच्या मांडीचें हाड मोडलें व त्यांना दवाखान्यांत ठेवण्यांत आलें. दिवाळी ५–६ दिवसांत येऊन ठेपली होती. ति. काका दवाखान्यांत होते व आम्ही सर्व मुलें लहान व अजाण होतों त्यामुळें आईचें मन द्विधा होऊं लागलें व ती सारखी काळजी करीत असे. रोज नियमानें पूजा–आरती चालू असायचीच. धनत्रयोदशीच्या पहांटेला श्री. साईबाबा कै. ति. सौ. आईच्या स्वप्नांत आले. आईनें प्रथम त्यांना ओळखलें नाहीं, परंतु बाबांनीं पूर्वीच्या दृष्टांताची आठवण देऊन ओळख पटवून दिली व "बाई, कांहीं काळजी करूं नकोस, मालक आज घरीं येतील" असें सांगितलें. कै. काकांनाही दवाखान्यांत पडून रहाण्याचा अतिशय कंटाळा आला होता. कै. आईनें त्यांना ही हकिगत सांगितल्यावर त्यांनीं सहजच मोठ्या डॉक्टरनां घरीं जाण्याविषयीं सकाळीं विचारलें असतां त्यांनीं त्यांना थोडेसें चालून दाखविल्यानंतर डॉ. नीं त्यांना एकदम घरीं जाण्यास परवानगी दिली. ते धनत्रयोदशीच्या दिवशीं दुपारींच घरीं आले; त्यामुळें आईची काळजी दूर झाली.

मद्रासला जाण्याचे वेळीं असा घोंटाळा झाला म्हणून ते नेहमीं साईबाबांच्या इच्छेप्रमाणें करण्याचा प्रयत्न करीत. १९४२ सालीं आम्हीं दरवर्षीच्या नियमाप्रमाणें दिवाळींतच द्वारकेला जायचें ठरविलें. साईबाबांस चिठ्या टाकून द्वारकेलाच जाण्या-विषयीं संमती मिळाली म्हणून आम्हीं घरांतील सर्व मंडळी व माझे थोरले मामा ति. रामभाऊ करंदीकर यांच्यासह द्वारकेच्या प्रवासास निघालों. द्वारकेपर्यंतचा प्रवास अत्यंत सुखदायक झाला. परंतु इतके लांब आलों आहोंतच तर गिरनारचा भागही जातां जातां पहावा असें मनांत आलें व त्याप्रमाणें सर्व व्यवस्था केलीही. पण तसें कसें होईल; कारण त्यांत श्रीसाईबाबांची आज्ञा मोडल्यासारखें झालें असतें म्हणूनच कीं काय कुणास ठाऊक प्रथम माझे वडील डायरियानें आजारी पडले. तेव्हां दोन-चार दिवस वाट पाहून जाऊं असें ठरविलें. परंतु काय योग कीं आमचे मामासुद्धां आजारी पडले व आम्हांला सर्व बेत रहीत करावा लागला व बाबांनीं सांगितल्याप्रमाणें फक्त द्वारकेचाच प्रवास करून घरीं परत यावें लागलें.

वेळोवेळीं श्रीसाईबाबा त्यांची संकटांतून मुक्तता करीत असल्यानें त्यांची साई-बाबांवर दृढ भक्ति जडत चालली. दररोज आमच्याकडे न चुकतां आरती होत असे. एकदां काय झालें, त्यांच्या सरकारी कामांत कांहीं तरी घोंटाळा झाला. त्यांत काकांची कांहींच चूक नव्हती. परंतु ऑफीसमधील ते एक जबाबदार व्यक्ती असल्यानें त्यांना सारखी काळजी वाटत असे. रात्रंदिवस त्यांना झोंप नसे. नित्यनियमाप्रमाणें पूजा आरती वगैरे चालू होतींच शिवाय ते बाबांचें एकसारखें नामस्मरण करीत. एक दिवस बाबा स्वप्नांत आले व "बेटा कांहीं काळजी करूं नकोस" असें सांगितलें. अन् काय चमत्कार, त्याचा निकाल काकांच्या बाजूनें लागला व त्यांना बाबांनीं संकटमुक्त केलें. पुढें एकदां गंमत झाली. माझा थोरला भाऊ मॅट्रिकच्या परीक्षेस बसला. त्याला त्याच्या

यशाबद्दल खात्री नव्हती म्हणून वडिलांना फार काळजी वाटत असे. परंतु निकाल लागण्याच्या आदल्या रात्रीला बाबांनीं दृष्टांत दिला व तुझा मुलगा पास झाला आहे तेव्हां माझी दक्षिणा काढ असें सांगितलें. अन् काय मजा तो खरोखरीच यशस्वी झाला. मग पुढें त्याला त्यांनीं आपल्याबरोबर शिरडीस नेलें व तेथें त्याच्या हातून सत्य-नारायण करविला व त्यास संस्थानचा सभासद केला.

त्यांना सकाळीं ९॥ वाजतां ऑफिसांत जावें लागत असे म्हणून ते सकाळीं लौकर उठून स्नान आटोपून संध्या, पूजा करीत. नंतर श्री साई सच्चरित्राचा एक अध्याय न चुकतां वाचीत व मगच ते जेवत. संध्याकाळीं ऑफिसांतून आल्यानंतर थोडा वेळ विश्रांति घेतल्यावर आम्हीं सर्वजण बाबांची आरती करीत होतों. बहुतेक दर गुरुवारीं बाबांचें भजन होत असे. शिवाय एकादशीसारख्या पुण्य दिवशींसुद्धां भजन करीत. आम्हांला बाबांच्या भक्तीची गोडी लागावी म्हणून ते आम्हांला अभ्यास बाजूला ठेवावयास लावून भजनास बसवीत.

त्यांचा स्वभाव फार प्रेमळ होता. काम करण्याची चिकाटी फार दांडगी होती. एकदां हातीं घेतलेलें काम पुरें केल्याशिवाय ते जेवत अगर झोंपत नसत. भुसावळेस न चुकतां पार पडत असत, नाशिकला आल्यावर धंद्याच्या निमित्तानें सर्व गोष्टींसच उशीर होऊं लागला. न त्यामुळें आईवडिलांच्या दोघांच्याही तब्येती चांगल्या रहात नसत. १९४९ सालीं मे महिन्यांत माझी आई अंथरुणाला खिळली. व ३–४ महिन्यांच्या आजारानंतर आश्विन वद्य सप्तमीला गुरुवारी रात्रीं १०॥ वाजतां ती श्री साईचरणीं लीन झाली. आईच्या निधनानें त्यांना जबरदस्त धक्का बसून त्यांच्या मनावर परिणाम झाला व त्यांना हृदयाचा विकार जडला. आईच्या नंतर बरोबर चार महिने तेरा दिवसांनीं २६ फेब्रुवारी संध्याकाळीं ६॥ वाजतां श्री साईचरणीं विलीन झाले. सहा महिन्यांच्या आंत आई व वडील दोघेही ईश्वरचरणीं लीन झाल्यानें आम्हीं मुलें आतां पोरकीं झालों आहोंत. बाबांनीं त्यांना वेळोवेळीं संकटमुक्त केलें त्याप्रमाणें बाबांची आमच्या-वरही अशीच सदोदित कृपा राहो अशी साईचरणीं प्रार्थना करतें. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो.

कु. विमल गोविंद वाड

# ' तुषार '

सत्य म्हणजे असणारें, कधींही नाहींसें न होणारें, तिन्हीत्रिकाल अबाधित रहाणारें तें.

× × × ×

मनुष्याचीं इंद्रियें त्याला नेहमीं पशुप्रमाणें वागण्यास सांगत असतात. आणि त्याची बुद्धि त्याला उलट खेंचित असते.

× × × ×

अखील मानव जातीवर प्रेम ठेवून सदैव सर्व लोकांच्या कल्याणासाठीं झटणें यासच मानव धर्म म्हणतात.

× × × ×

इंद्रियांच्या व मनाच्या वृत्ति मारण्याच्या भरीस न पडतां, सदर वृत्ति आपल्या फायद्याच्या होण्यास इंद्रियें व मन आपल्या ताब्यांत ठेवा.

× × x ×

परार्थ हाच ज्याचा स्वार्थ झाला तोच सर्व सत्पुरुषांत श्रेष्ठ होय.

× × × ×

मनुष्याची सुखाविषयिक इच्छेची धांव नेहमींच एक पाऊल पुढें असल्यामुळें त्याच्या कपाळीचें दुःख कधींच सुटत नाहीं.

× × × ×

कुणालाही नेहमींच सुख किंवा नेहमींच दुःख अशी स्थिति येत नसून सुखदुःखाची दशा चाकाच्या धावेप्रमाणे एकसारखी खालीं-वर होत असते.

× × × ×

मनुष्याचीं अशुभ कर्में तीन प्रकारचीं. कायिक, वाचिक व मानसिक.

**कायिकः**—शिंदळकी, हिंसा व चोरी. ही तीन कायिक.

**वाचिकः**—कडू, खोटें, उणें आणि विसंगत बोलणें ही चार वाचिक.

**मानसिकः**—परद्रव्याभिलाष, दुसऱ्याचें वाईट चिंतणें आणि खोटा आग्रह ही तीन मानसिक मिळून अशुभ कर्में दहा आहेत.

× × × ×

सत्य भोळा देव कृपेचा सागर। न मोडी उत्तर संत आज्ञा॥
भाविकाची सेवा न म्हणे फार थोडी। स्वीकारी आवडी आपुलिये॥

× × × ×

निमित्ताचा धनी, केला असे प्राणी। माझें माझें म्हणोनी व्यर्थ गेला॥

× × × ×

तुका म्हणे नाहीं चालत तांतडी। प्राप्त काल घडी आल्याविण॥

× × × ×

असत्य ते वाणी, तेथें पापाचीच खाणी.

× × × ×

बांधिलें गांठीं तें लागलें भागावें, ऐशीयांसी देवें काय किजे.

× × × ×

रवि रश्मी धरून, गगना जाऊं येईल, परि साधु न भेटेल भावाविण.

× × × ×

साधन ते सेवा संतांची उत्तम, आवडीनें नाम गाईजे ते.

× × × ×

जरी पूर्वपुण्याचा असेल ठेवा, तरीच संतांची घडेल सेवा, तयाचा आभार पडतसे देवा, सोडवी भवार्णवा पासोनी.

× × × ×

जेणें हा जीव दिला दान, तयाचें करीत चिंतन जगजीवन नारायण, गाईन गुण तयाचे.

× × × ×

आम्हीं विष्णुदासीं देव घ्यावा चित्तें। होणार तें होतें प्रारब्ध.

× × × ×

संत तेची देव जाण, दोघांत नाहीं भेद मान, सावध करावयासी जन, झाले सगुण अवतारी.

× × × ×

योगमार्ग बहुत कठीण, विरळा साधी लक्षांतून, भोळ्या सकळा कारण, नामची पावन करितसे.

व्हावया जडमूढ उद्धार, पुंडलिके केला उपकार, साक्षात् परब्रह्म विटेवर, दर्शनेंच उद्धार सकळांसी.

बाबांचा बाच्या.

---

## विनंती

श्री साईलीला त्रैमासिकाची वार्षिक वर्गणी २-४-१९५१ सालाची सर्व सभासदांनीं, सर कारकून शिरडी संस्थान, शिरडी, पो. शिरडी. जि. अहमदनगर येथें भरावी. व १९५० ची वर्गणी न आल्यास १९५१ चा अंक मिळणार नाहीं.

# श्री साईबाबा शिरडी संस्थानांत

## विक्रीकरितां असलेलीं पुस्तकें

| | | किंमत<br>रु. आ. पै |
|---|---|---|
| १ | श्री साई सच्चरित्र ( मराठी ) .... ... | ७—०—० |
| २ | सच्चरित्र ( इंग्रजी ) .... .... | ४—०—० |
| ३ | दासगणूकृत श्रीसाईनाथ स्तवनमंजरी .... | ०—२—० |
| ४ | ,, [ अध्याय ४-था ] .... | ०—८—० |
| ५ | सगुणोपासना .... .... .... | ०—३—० |
| ६ | प्रधानकृत पुस्तक ( इंग्रजी ) .... .... | १—४—० |

वरील पुस्तकांकरितां व बाबांचे विश्वसनीय निरनिराळ्या साईजच्या फोटो वगैरेकरितां खालील पत्यावर लिहावें.

मॅनेजर, **शिरडी संस्थान**, मु. शिरडी, पो. रहातें, जि. **अहमदनगर**

---

[illegible] शिरडी संस्थान कमिटी तर्फे
संपादक [illegible] यांनी, काळाचौकी रोड,
मुंबई १२ येथें [illegible] केलें.

मुद्रक :—के. एन्. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, ज्युडेक्स बिल्डिंग,
त्रिभुवन रोड, मुंबई ४

# श्री साई लीला

## श्री साईनाथ प्रसन्न



गोदावर्याः प्रवाहो विलसति यदुदक्पार्श्वतो योजनैकम् ।
प्रादुर्भूत्वाऽत्मभूत्या निशजनितमहे शीलधिक्षेत्रधाम्नि ॥
सर्वेशार्तीयवृंदैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः ।
पूर्णब्रह्मैव साक्षाद्विजयति भुवनं पावयन्साइनाथः ॥

वर्ष २६ ] त्रैमासिक—जानेवारी, फेब्रुवारी, मार्च १९४९ [ अंक ५ वा

## —: संपादकीय :—

शुभ कर्मांचे शुभ फल व अशुभ कर्मांचे अशुभ फल हें सिद्ध आहे. कोणाही प्राण्याला मनानें अगर शरीरानें दुःख देऊं नये; उलट परोपकारानें दुसऱ्यास आपला ऋणी करून ठेवावें. "अष्टादश पुराणांनां सारं सारं समुद्धतम् । परोपकाराय पुण्याय पापाय परपीडनम् ॥

सांई भक्तांनीं आपण आपले स्वतःचे अनुभव (श्री सांईविषयीं) साईलीलेंत छापण्यास पाठवा आणि श्री साईच्या गोड सहवासाचें गोड फळ कसें मिळतें तें आपल्या आतस्वकीयांना दाखवून त्यांना कायमचे ऋणी करून ठेवा व त्यांना साईची सेवा करण्यास भाग पाडा.

प्रभू रामचंद्राची सेवा श्री मारुतीरायानें केली व जगाला सेवाधर्म शिकवला. दुःखितांचें दुःख हरण करणें, संकटांत सांपडलेल्यास हात देणें व गरीबाला आधार देणें प्रत्येक मानवाच्या हातांत आहे.

भक्ति करणें म्हणजे सेवा करणें. ईश्वर जळीं स्थळीं, इकडे तीकडे चोहींकडे व्यापून उरला आहे, असें जर म्हणतात तर तो प्रत्येक प्राण्याच्या हृदयांत आहेच आहे. तर मग दुसऱ्याची सेवा करणें–मग तो हीन: अगर मोठा असो–म्हणजे पर्यायानें ईश्वराचीच सेवा करणें होय.

भक्त कोणाला म्हणतात? ज्याच्या हृदयांत, दया, क्षमा, शांति नांदत आहे, जो मानाकरितां हपापलेला नाहीं अगर ज्याच्या स्वप्नींसुद्धां दुसऱ्याविषयींचा किंतू ( वाईट इच्छा ) येत नाहीं व जो सतत आपलें सत्कर्म करीत असतो तोच खरा भक्त.

कलियुगांत जो तो मानाकरितां हपापलेला आहे. मोठेपणा, भांडून, कायद्यानें अगर दुसऱ्याची निर्भत्सना करून मिळणार नाहीं, तर लहान होऊनच तो मिळेल. " लहानपण देगा देवा । मुंगी साखरेचा रवा ॥ "

मनुष्याचा स्वभाव संस्कारासंस्कारानें बनतो, व संस्कार बदलले तर स्वभाव बदलतो, व स्वभाव बदलला तर संस्कार बदलतो. आमची स्वाभाविक वाईट विषयांकडे प्रवृत्ती होणें ह्याचे कारण हाडींमाशी खिळलेले–मातृदोष, पितृदोष, व भूमीदोष होत. " खाण तशी माती व कूळ तशी संतती."

" राम–लक्ष्मण एकदां सह्याद्रीपर्वत उतरून समुद्रस्नानास जात होते, श्रीमंत दशरथ राजाचे हे पुत्र. वाटेनें जात असतां लक्ष्मणाच्या मनांत एकाएकी असें आले कीं रामानें राज्य करावें व मी मात्र त्याची सेवा करावी; बरें वनवासांतही मी कंदमुळें आणून रामाला द्यावीं आणि मी मात्र उपोषीत रहावें, हा ज्येष्ठ बंधू म्हणून त्याची व त्याच्या पत्नीची मी सेवा करावी! लक्ष्मण हा आज्ञाधारक होता त्यानें स्नान करीत असतांच विचार केला कीं, श्री प्रभू रामचंद्राच्या सेवेंत कांहींतरी चूक झाली असेल, म्हणून अशा तऱ्हेची कुभावना माझ्या मनांत आली असावी.

स्नान आटोपल्यावर परत येत असतां तीच भूमि चालूं लागल्याबरोबर लक्ष्मणाच्या मनांत परत तेच विचार घोळूं लागले. प्रभू रामचंद्रानें लक्ष्मणाच्या मनांत काय गोंधळ चालला आहे हें जाणून प्रभू रामचंद्र म्हणाले, ' लक्ष्मणा, ही तांबडी माती फार चांगली आहे. ह्याचा थोडासा नमुना तूं आपले जवळ ठेव. ' लक्ष्मणानें एक पुडी बांधली व ती आपणांकडे ठेवली.

सह्याद्रीपर्वत ओलांडून आल्यावर ज्या ज्या वेळीं ती पुडी लक्ष्मणाचे जवळ राही त्या त्या वेळेस, प्रभू रामचंद्राविषयीं त्याचे मनांत कुकल्पना येत. असें दोनचार दिवस लोटल्यावर ' पाप ' लपवून ठेवण्यापेक्षां उघडें केलें असतां त्याचा जोर कमी होतो म्हणून लक्ष्मणानें आपल्या मनांत अशा तऱ्हेचे विचार येण्याचें कारण काय असावें असें श्री रामचंद्रास विचारलें तेव्हां सर्वसाक्षी प्रभू रामचंद्र म्हणाले, ' हा मातीचा गुण आहे ' ती पुडी फेकून दे म्हणजे झालें. त्याप्रमाणें त्यानें केल्यावर त्याचे सर्व कुवीचार लय पावले. प्रत्यक्ष देवादिकांना सुद्धां जर हे संस्कार टाळतां आले नाहींत तर मनुष्य प्राण्याची कथा काय?

मनुष्याचें मन हें अन्नापासून झालेलें आहे. ज्या गुणाचें अन्न ( सत्व, रज, तामस ) मनुष्य प्राणी सेवन करतो तसें त्याचें मन बनतें व अन्नाचे संस्कार आपल्या विचारावर पगडा पाडतात.

एक संन्यासी एका श्रीमान् ग्रहस्थाचे घरीं जेवण्यास गेला. भोजनाचा बेत फार सुंदर होता. चांदीचा पाट, ताट, तांब्या, पळी वगैरे वगैरे; संन्यासी पंचपक्वान्नाच्या भोजनानें तृप्त झाला, व तो पानावरून उठणार इतक्यांत चांदीची पळी चोरून न्यावी अशी इच्छा त्याच्या मनांत उत्पन्न झाली, संन्यासी ज्ञानी होता. त्यानें आपल्या मनांत वाईट विचार आल्याबरोबर यजमानास आपण उद्योग काय करतां म्हणून स्पष्ट विचारलें, " तो ग्रहस्थ म्हणाला वृद्धापकालामुळें सध्यां मी कांहींच करीत नाहीं, परंतु एकदां आपत्काल प्राप्त झाला असतां मी हें सर्व द्रव्य चौर्यकर्मानें संपादन केलेलें आहे. त्या दोषाचें क्षालन व्हावें म्हणूनच मी प्रस्तूत सत्पात्र ब्राह्मणांना अन्नसंतर्पण करीत असतों."

ईशावास्यमिदं सर्वं यत्किंच जगत्यां जगत् ।
तेन त्यक्तेन भुंजीथा मा गृधः कस्यचिद्धनम् ॥

हे सर्व जगत् परमेश्वरानें निर्माण केलें. जें कांहीं दृश्य आहे व अनुभावास येतें, ते सर्व त्यांची कृति आहे. मग मिळेल त्यांत संतुष्ट रहा. दुसऱ्याचा हेवा करून त्याच्या जवळचे हिसकावून घेण्याची इच्छा करूं नका, असें ईशावास्योपनिषत्कार सांगतात.

संतसमागमांत आपल्यावर चांगलेच संस्कार होतील व वाईट संस्कार निघून जातील. मातृदोष, पितृदोष व भूमीदोष निघून जाऊन आपले आचारविचार शुद्ध, सात्विक बनतील. म्हणून साई भक्तांनो आपले अनुभव तसेंच श्री. साईविषयींचे लिखाण त्वरित ' साईलिलेंत ' छापण्याकरितां पाठवा आणि सर्व बंधु भगिनींना, संस्कार प्राबल्यानें किंवा स्थलमहात्म्यानें मनोविचारांत फरक कसा पडतो हें दाखवा आणि सत्संगतीचा, शुभकर्मांचा व चांगल्या आचरणाचा परिणाम आश्चर्यकारक होतो हें जगाला पटवा.

**संपादक**

---

# साईबाबा कोण ?

ईश्वराची मर्जी संपादन करण्याकरितां ज्या आवडत्या देवाचे आपण नामजप करत असतो, त्या मूर्तीचे जर आपण प्रत्यक्ष अगर मनांत ध्यान केलें व तेथें एकाग्रता साधतां आली तर आपणाला अविनाशी सुख मिळेल; त्याकरितां आपण स्वतःला अंतर्बाह्य पुरुषोत्तम व्हावें लागेल.

स्वतः पुरुषोत्तम बनणें म्हणजे ' श्रवण, मनन व निदिध्यास ' ही त्रयी आपण व्यापक अर्थानें अनुसरली पाहिजे. । अनुसरतानां जडते नाते । जीवा शिवा भेटविते ॥

श्रवण म्हणजे नुसतें कानानें ऐकणें योग्य होणार नाहीं, तर सर्व सृष्टीचें निरीक्षण करणें, मननः—जे निरीक्षिलें त्यापासून सारासार—शिक्षण घेणें व निदिध्यास—स्वतःला

सृष्टींतील परमात्मतत्त्वाशीं तद्रूप–निमग्न होणें. ' श्रवण, मनन, निदिध्यास ' याचा एवढा व्यापक अर्थ आहे व जेव्हां काया–वाचा–मनें आपल्याकडून पूर्णपणें अनुसरला जाईल तेव्हांच आपण पुरुषोत्तम होऊं.

निदिध्यास करण्याकरितां सद्गुरु अगर प्रतीमा पाहिजे व शिरडीचे साईबाबा हे स्वतः पुरुषोत्तम आहेत व आपणां प्रत्येकाला पुरुषोत्तम बनविण्यासाठीं त्यांनीं अवतार घेतला आहे. अर्थात त्यांचेच पाय धरणें व निदिध्यास करणें योग्य होईल.

श्री बाबा हे नाथ पंथी होते व ते आदीनाथ होते व त्यांचा उल्लेख ' श्री राममारुती महाराज ' ( समाधीस्थ ) ह्यांच्या चरित्रांत मिळतें.

" महाराजा पुसतां समजलें ! सांई आदिनाथ प्रवर्तले । सांईनीं नाथ संबोधिलें। अवतार नाथ परंपरा ॥ ७९ ॥ महाराज जाण्या आधीं शेरडीस । कांहीं परिचित दर्शनास। सांई शिष्यें आग्रहास । पडून विनवींत महाराजा ॥ ८० ॥ सांईबाबा अंश कोणाचे आपणा नाथ म्हणेल त्याचे । सर्वपरी या गूढाचें । पूर्व सर्व सांगणें ॥ ८१ ॥ महाराज हांसून सांगती । सर्व नाथ परंपरेचें असती। आदिनाथ ते सांई सांप्रति। सांईरूपें प्रकटले ॥ ८२ ॥ आम्ही असों भुजंगनाथ। आमचे **सद्गुरू** बाळ मुकुंद होत । परी सांईसह ते समान असत । सद्गुरु मूर्ती वंद्य त्या ॥ ८३ ॥ यापरी नाथ मार्गाचा खुलासा। महाराज मुखें ज्ञात झाला खासा। ब्रह्मचर्याकृति भासा। हनुमंत रूप दावित ॥ ८४ ॥ नाथ म्हणावा हनुमंत गणा । सिद्धरूप अंशात्मक जाणा। मार्ग दावावया अञ्जना। अवतरले हे निश्चित ॥ ८५ ॥ श्री राममारुती अ. ४ था."

तसेंच ' श्री माधव नाथ दीपप्रकाश '

श्री परमहंस शीलनाथ। श्री सद्गुरू सांईनाथ । धुंडिराज पुळसी गजानन शेगावांत। गोपाळदास ( नरसिंग महाराज ) नाशिकीं॥ हें पंचायतन नाथांचे ( श्री माधवनाथ ) परम होते जिव्हाळ्याचे । चाले सूत्र एकमेकांचे । अंतःशक्तिनें ॥ श्री. मा. दी. प्र. अ. २२–१०९–१०

श्री बाबांच्या जन्मवृत्तांतासंबंधी मिळालेली माहितीः—

" मोंगलाईंत पाथरी म्हणून गांव आहे. तेथें एक यजुर्वेदी देशस्थ ब्राह्मणास तीन मुलगे होते. वडील मुलगा हाच ' श्री साई !' बाबा पांच वर्षांचे असतां एक ' अवलीया ' त्या ब्राह्मणाकडे आला व माझें मला दे ' म्हणून म्हणाला. त्यावर ' आहे तें तुमचेंच आहे ' असें बाबांच्या वडिलांनीं सांगितलें. तेव्हां ' तुझा वडील मुलगा मला दे ' असें म्हणून तो अवलीया बाबांना घेऊन गेला. बाबांच्या नवव्या वर्षी परत त्यांना त्यांच्या वडिलांकडे घेऊन तो आला व त्याचे हस्तें दूध घेऊन परत बाबांना तीन वर्षें कोठें घेऊन गेला. वयाच्या १२ ते १८ पर्यंत बाबा अज्ञातवासांत होते. व ' १९ ' व्या वर्षी शिरडींत निंबाच्या झाडाखालीं प्रकट झाले. त्यांची मुंज झालेली नव्हती." दाभोळकर कृत साईसचरित्रांत श्री बाबांच्या उक्तींतच ही माहिती सुसंगत असल्याचे प्रत्ययास येते. अर्थात् बाबा हें हिंदू होते हे सिद्ध झालें. त्यांची मुंज झाली नव्हती म्हणून त्यांच्या

गळ्यांत यज्ञोपवीत नव्हतें, तरी हिंदुधर्मांप्रमाणें त्यांचे कान टोंचलेले होते. मोंगलाईंत जन्म झाल्यामुळें यवनी भाषा, वेष व आचार इत्यादीचा बोध होतो.

ब्रह्म जानाति इति ब्राह्मणः । बाबा स्वतः ज्ञानी होते व त्रिगुणातीत होते. बाबांचा त्रिगुण देहधारी हा नाटकी वेष होता. ते वासनाबंधनयुक्त जन्मास आलेले नाहींत, तर वासना खंडून ज्ञानी अवस्थेंत उदयाला आले. श्रीकृष्ण परमात्म्यांची मुंज झाली नव्हती व त्यांनीं सांदिपनी गुरू केला, तसेंच बाबांचीहि मुंज झाली नव्हती व त्यांनीं व्यंकुसहा गुरु केला, हे उभयतांतील साम्य भक्तांनीं लक्षांत घ्यावें.

" हिंदू म्हणावे जरी तयास । मशिदीत सदा निवास ।।
यवन म्हणावे तरी हुताश । अहर्निश मशिदीं ।।
मशिदींत जात्याचे दळण । मशीदींत घंटाशंख वादन ।।
मशीदींत अग्निसंतर्पण । मुसलमान कैसे हें ।।
मशीदींत सदैव भजन । मशीदींत अन्नसंतर्पण ।।
मशीदींत अर्घ्य पाद्य पूजन । मुसलमान कैसे हे ।। दा. सां. स. ७.

ह्यावरून बाबा स्वतः हिंदू होते व स्वतः पुरुषोत्तम झालेले असल्यामुळें जातीपातीचा अगर कसलाही भेदभाव त्यांच्यापाशीं शिल्लक राहिलेला नव्हता.

आमचा देव निराकार असून, तो पुन्हा निर्गुण आहे शिवाय तो " अणुरणीयान महतो महीयान " असा आहे. श्रीकृष्ण भगवान म्हणतात—मी सर्वत्र आहे. व हृदयाचे ठिकाणीं वास करीत असतों. पण देव व मोठमोठे ऋषीसुद्धां मी कसा प्रकट झालों आहे ते जाणत नाहींत. कारण मी परमेश्वर देव व ऋषी यांचें आदिकरण आहे. ( गीता १०–२ ) तरी पण लोकांना विसर पडूं नये म्हणून सर्व भूतांच्या अंतरीं असणारा आत्मा मी, सर्व भूतांचा आदि मी, मध्य मी, व अंतही मी, सूर्य मी, चंद्र मी, वेद मी, इंद्र मी, मन मी, शंकर मी, पावक मी, बृहस्पती मी, भृगु मी, ऐरावत मी, कामधेनु मी, अशा कितीतरी आपल्या विभूति भगवंतांनीं गीतेच्या १० व्या अध्यायांत सांगितल्या आहेत. शेवटीं जो जो पदार्थ ऐश्वर्यवान किंवा तेजस्वी असेल तो तो माझ्या तेजाच्या अंशापासून उत्पन्न झाला आहे असें समज. हेतू हा कीं 'मी ईश्वरच' सर्वत्र भरलेला आहे त्याचा हिंदु जन्माला विसर पडूं नये.

परंतु मोहमायेच्या रज्जूनें ह्या देहांत हृदयग्रंथी पुष्कळ बांधलेल्या आहेत, त्यांचा जोपर्यंत लय झाला नाहीं. ( फुटल्या नाहींत ) तोपर्यंत ( मी ) पुरुषोत्तम कसा ओळखूं ?

देहादिकांच्या ठिकाणीं आत्मत्व असल्याचा निश्चय होणें ही पहिली मुख्य ग्रंथी कीं ज्याच्या योगानें हा संसार एवढा अवाढव्य व अनिवार झाला आहे, 'केवळ भासमात्मक जगाच्या ठिकाणीं आत्मा नाहीं असा होणें दुसरी ग्रंथी. जीव व ईश्वर निराळे निराळे भासणें, वगैरे ग्रंथीनें युक्त असा हा पुरुष बद्ध झाला आहे त्या ग्रंथी उलगडल्या म्हणजे बंधापासून मुक्ति होते.

बाबा वदती मृदु वचन। आभाळ आलें आहे जाण
पडेल पाऊस पीकपीकोन। आभाळ वितळून जाईल।

एकदां शिरडी गांवांत ग्रंथीज्वर आला. श्री. दादासाहेब खापर्डे यांच्या लहान मुलास ताप भरला. त्यांची आई घाबरून गेली व घरीं जाण्याची परवानगी मागण्यास बाबांकडे आली, बाबांनीं तिला धीर देऊन न भिण्यास सांगितलें व आपली कफनी कंबरे-पर्यंत वर करून दाखविली. तो बाबांच्या दोन्ही जांगेंत चार गांठी टवटवून उठलेल्या दिसल्या—असो.

स्पेसीफिक प्लेग बॅसिलाय आपल्या रक्तांत शिरल्यामुळें आपणांस ग्रंथीज्वर (Bubonic Plauge) होतो. ह्या तापांत भ्रम होतो व शेवटीं अंत होतो; तसेंच भवताप, भवभ्रम यांचे अधिकरण अज्ञान ग्रंथी होत व त्याच आपला नाश करतात. ग्रंथीज्वरांत मनुष्य मरतो म्हणजे जडदेह नाहींसा होतो.

भवग्रंथी ज्वरांत जीवात्मा मेलेला असतो म्हणजे देहाहंकारानें जन्ममरण पाशांत गुंततो व स्व–रूपाला विसरतो.

बाबांनीं आभाळाच्या दृष्टांतानें हेंच दाखविले आहे. आकाश–ह्या शब्दाचा अर्थ जागा, पोकळी जसें बाहेर नील–छत्र–गगन दिसते त्याला आकाश म्हणतात. घटाकाश, मठाकाश–घट व त्यांतील जागा, घटाकाश, मठ म्हणजे घर त्यानें व्यापलेली जी जागा ती मठाकाश व सर्व चराचर व्यापून टाकणारी जागा ती चिदाकाश.

आकाशांतून सर्व चराचर भासमान झालें; आकाशांतच तें स्थिरावलें व आकाशां-तच ते लय पावले; पण हें आपणांस आपला मायभ्रम–संकुचीत दृष्टी–निरसेल तेव्हा कळेल; मायाभ्रम हेंच तें आभाळ.

व्यवहारांत आपण आभाळ आलें त्यानें आकाश व्यापून टाकलें, असें म्हणतो, लगेच पाऊस पडतो व आभाळ वितळतें व परत जसेच्या तसेंच निळे आभाळ दिसते. आभाळ एकदेशीय येते पण आपल्या संकोचीत दृष्टीला सर्व आकाश व्यापलेलें दिसतें. तद्वतच मायेच्या आवरणामुळें व्यक्ती, धर्म, देव निरनिराळे भासतात, हाच भवताप,–भवभ्रम–अज्ञान ग्रंथीज्वर.

'भिती किमर्थ ऐसें वदून। कफनी कंबरेपर्यंत उचलून॥
दाविते झाले सकळा लागून। ग्रंथी टवटवून उठलेल्या॥

हें मायेचें आवरण–भ्रम दूर झालें, कफनी वर केली कीं एकमेव साईपरमात्म्याच्या अंगावर ह्या सर्व अज्ञान ग्रंथी खेळतात हें आपल्यास पटवून दिलें–अज्ञान ग्रंथी फुटतात, आभाळ ओसरते आणि आपला भवताप जाऊन जिवात्मा चित्तत्वांत समरसून चिरंजीव होतो.

व्यवहारांत 'मी' 'माझे' इत्यादि 'आपलें'पणांनीं सर्वांस इतकें मोहिले आहे कीं आपला समदृष्टिकोन जन्मोजन्मी होणें मुष्कील आहे. आणि म्हणूनच आध्यात्मांत

बाबा वदती मृदु वचन । आभाळ आलें आहे जाण
पडेल पाऊस पीकपीकोन । आभाळ वितळून जाईल ।

एकदां शिरडी गांवांत ग्रंथीज्वर आला. श्री. दादासाहेब खापर्डे यांच्या लहान मुलास ताप भरला. त्यांची आई घाबरून गेली व घरीं जाण्याची परवानगी मागण्यास बाबांकडे आली, बाबांनीं तिला धीर देऊन न भिण्यास सांगितलें व आपली कफनी कंबरे-पर्यंत वर करून दाखविली. तो बाबांच्या दोन्ही जांगेंत चार गांठी टवटवून उठलेल्या दिसल्या—असो.

स्पेसीफिक प्रेग बॅसिलाय आपल्या रक्तांत शिरल्यामुळें आपणांस ग्रंथीज्वर (Bubonic Plauge) होतो. ह्या तापांत भ्रम होतो व शेवटीं अंत होतो; तसेंच भवताप, भवभ्रम यांचे अदिकरण अज्ञान ग्रंथी होत व त्याच आपला नाश करतात. ग्रंथीज्वरांत मनुष्य मरतो म्हणजे जडदेह नाहींसा होतो.

भवग्रंथी ज्वरांत जीवात्मा मेलेला असतो म्हणजे देहाहंकारानें जन्ममरण पाशात गुंततो व स्व–रूपाला विसरतो.

बाबांनीं आभाळाच्या दृष्टांतानें हेंच दाखविले आहे. आकाश—ह्या शब्दाचा अर्थ जागा, पोकळी जसें बाहेर नील–छत्र–गगन दिसते त्याला आकाश म्हणतात. घटाकाश, मठाकाश–घट व त्यांतील जागा, घटाकाश, मठ म्हणजे घर त्यानें व्यापलेली जी जागा ती मठाकाश व सर्व चराचर व्यापून टाकणारी जागा ती चिदाकाश.

आकाशांतून सर्व चराचर भासमान झालें; आकाशांतच तें स्थिरावलें व आकाशां-तच ते लय पावले; पण हें आपणांस आपला मायभ्रम–संकुचीत दृष्टी–निरसेल तेव्हा कळेल; मायाभ्रम हेंच तें आभाळ.

व्यवहारांत आपण आभाळ आलें त्यानें आकाश व्यापून टाकलें, असें म्हणतो, त्योच पाऊस पडतो व आभाळ वितळतें व परत जसेच्या तसेंच निळे आभाळ दिसते. आभाळ एकदेशीय येते पण आपल्या संकोचीत दृष्टीला सर्व आकाश व्यापलेलें दिसतें. तद्वतच मायेच्या आवरणामुळें व्यक्ती, धर्म, देव निरनिराळे भासतात, हाच भवताप,—भवभ्रम—अज्ञान ग्रंथीज्वर.

'भिती किमर्थ ऐसें वदून । कफनी कंबरेपर्यंत उचलून ॥
दाविते झाले सकळा लागून । ग्रंथी टवटवून उठलेल्या ॥

हें मायेचें आवरण–भ्रम दूर झालें, कफनी वर केली कीं एकमेव साईपरमात्म्याच्या अंगावर ह्या सर्व अज्ञान ग्रंथी खेळतात हें आपल्यास पटवून दिलें—अज्ञान ग्रंथी फुटतात, आभाळ ओसरते आणि आपला भवताप जाऊन जिवात्मा चित्तत्वांत समरसून चिरंजीव होतो.

व्यवहारांत 'मी' 'माझे' इत्यादि 'आपले'पणांनीं सर्वांस इतकें मोहिले आहे कीं आपला समदृष्टिकोन जन्मोजन्मी होणें मुष्कील आहे. आणि म्हणूनच आध्यात्मांत

कृपादृष्टीं ठेवा । तारी या केशवा ॥
मार्गें न जावा । तुजपाशीं ॥ ३ ॥
जीवीचा जिवलग । साई माझा देव ॥
हृदयींचा भाव । जाणतसे ॥
भाव तेथें देव । संत म्हणताती ॥
जीव शिव एक । भावापोटीं ॥
ठेविला हा भाव । साई चरणीं जीव ॥
द्यावा अनुभव । केशवासी ॥ ४ ॥
जीव शिव पक्षी । दिसताती भिन्न ॥
मायेचें वेष्टन । तरु लागी ॥
माया रांड कपटी । भाळी अज्ञ जनां ॥
दुःखाच्या वेदना ॥ अंतःकाळी ॥
दूर सारा पैका । गांठीं पाडा पैका ॥
अल्ला मालीक ऐका । सदोदीत ॥
फुकाचा हो मंत्र । नको दुसरें तंत्र ॥
चालू ठेवा संत्र । नित्यनेमी ॥
जीव शिव पक्षी । दिसतील एक ॥
प्रभूचरणीं मात्र । लक्ष ठेवा ॥
जीव तोची शिव । नाहीं भिन्न भिन्न ॥
करा दृढमन । साईपाशीं ॥
साई तोचि ईश । नका सोडूं त्यास ॥
विनवी जनांस । केशव ॥ ५ ॥
त्रास देतीं पोरें । बाईल नील्य रडे ॥
कर्माचे हे धडे । दाखविती ॥
त्रासलों संसारा । नाहीं कुठें थारा ॥
शांतीचा आसरा । देऊळासी ॥
देव तो देऊळा । धरीं हृदयीं बाळा ॥
कर्माच्या कपाळा । पाय देई ॥
कर्म करा नीट । करील तो धीट ॥
नका करूं वीट । संसाराचा ॥
आपुल्या कर्मानें । आपण मरतों ॥
दोष तो लावतो । दुसऱ्याला ॥
करी दृढ मन । विसरा मान पान ॥
प्रभू चरणीं मन । असूं द्यावें ॥
संसाराचें दुःख । सांगूं नको कोणा ॥

विनवी तो जना । केशव ॥ ६ ॥
संसारीं दुःखाचे । डोंगर साजीरे ॥
अंगारे धुपारे । करीताती ॥
जोतिषी तपस्वी । लोकां भूलविती ॥
नादीं ते लाविती । भोळे जनां ॥
नाहीं ताळमेळ । कुणाचा कुणाला ॥
घात त्यानें केला । जनतेचा ॥
भाव एक ठेवा । सांईवरी आतां ॥
दुःखाचा दुखवटा । करी दूर ॥
नका लागूं नादी । जोतिष्याच्या आदीं ॥
नका विसरूं कधीं । साईनाथा ॥
शिरडीची माऊली । साई श्री साऊली ॥
पाजी ती तान्हीली । केशव म्हणे ॥ ७ ॥
लहान मुलाचे । कान टोंचताती ॥
नाक टोंचताती । मुलींचें ॥
नाक आणि कान । शोभेचें साधन ॥
विषयाचें वान । कलियुगीं ॥
विषयाचें सुख । कलीच्या ह्या घरीं ॥
खऱ्या आत्मसुखा । आंचवती ॥
इंद्रिय दमना । केल्या विना कलीं ॥
नाहीं खरी शांती । या देहीं ॥
टोंचतील कान । संत मोठेपणीं ॥
मंत्र उच्चारुनी । वेळोवेळां ॥
नमस्कारानेंच । नाक टोंचिलीं ॥
खूण ते पटावली । अहंपणीं ॥
नका जाऊं मागें । विषयसुखा लागें ॥
आत्मसुखाचा । शोध करा ॥
आत्मसुख आहे । तुमच्याच हृदयीं ॥
नको जाऊं दारीं । विषयाच्या ॥
नाक आणि कान । तोंड आणि भान ॥
धरा साई चरण । म्हणे केशव ॥ ८ ॥
मन रंगलें दंगलें । साई चरणीं लीन झालें ॥
जिवीचा जिवलग सखा । तो हा शिरडीमाजीं देखा ॥
विश्वचैतन्याचा गाभा । भक्तांसाठीं तिष्ठत उभा ॥
राम मारुति म्हणती नाथ । साई आहे आदिनाथ ॥

शिष्य पुसे कोण पंथ । अमुचा सर्वनाथ पंथ ॥
प्रेमळाला देतो मोद । नाहीं मानत भेदाभेद ॥
जाऊनिया त्याच्याकडे । सांगा आपुलें हो सांकडें ॥
शरण शरण शिरडीसाई । दास केशव तुझ्या पायीं ॥ ९ ॥
बायका पोरें भाऊ मित्र । घरांत माझें कलत्र ॥
थारा नाहीं शांती नाहीं । सौख्य नाहीं एकत्र ॥
कुठें जाऊं कुणा पुसूं । काय आहे हें सत्र ॥
मिळेल शांती नाहीं भ्रांती । कुठें आहे हो अन्यत्र ॥
जा, जा तुम्हीं साईपाशीं । मिळेल शांती सौख्य राशी ॥
जाऊं नका हो कुणापाशीं । आहे तो हो शिरडीशीं ॥
सोयरे धायरे भाऊ बहिणी । आहेत सारे पैश्यावाणी ॥
कोणी नाहीं कुणाचा कुणी । केशव म्हणे सांई धणी ॥ १० ॥
बोला जयश्री जयश्री राम । मना देई तो आराम ॥
मना बांधा त्याची लगाम । मुखानें घ्यावें सीताराम ॥
स्वार होऊनी शोधा अपुलें धाम । जवळी आपुल्या आत्माराम ॥
मीपणाचा खोटा धरी अभिमान । करूं नका हो जिविचें नुकसान ॥
अहंपणाचा करा पूर्णविराम । जवळीसांगे केशव तो भगवान ॥ ११ ॥

## १२

नयनमनोहर मूर्ति सुंदर वाचा सिद्ध तुझी । साईवाचा सिद्ध तुझी ॥
भक्त तुझे हे वाट पाहती, आशिर्वादाची ॥ १ ॥
संत शिरोमणी त्रिगुणात्मक तूं मूर्ति रामाची । बाबा मूर्ति रामाची ॥
उपेक्षती दास तुझे प्रभू नित्य आरामाची ॥ २ ॥
साधें सोपें नाम तुझें, परी कठीण म्हणायाला । देवा कठीण म्हणायाला ॥
कृपा करा महाराज आतां परि तें घेण्याला ॥ ३ ॥
भोळी भाळी भक्ति बाबा करितों तुझी सेवा । बाबा करितो तुझी सेवा ॥
मान्य करुनि घ्या आतां अमुची लघुसेवा ॥ ४ ॥
पतीत पावन असती देवा समाधी शिरडीशीं । साई समाधी शिरडीशीं ॥
गरीबांचा वाली दयाळा धांवूनि तूं येशी ॥ ५ ॥
संसारीं विटलों आम्हां ध्यास एक तुझा । बाबा ध्यास एक तुझा ॥
प्रश्न तरीं सांई सखया अमुच्या अब्रूचा ॥ ६ ॥
जाऊं कुठें सगुणात्मक तूं हो । एक तुझा भरंवसा ॥ बाबा एक तुझा भरंवसा ॥
अंत नको पाहूं सखया पुरवी तूं आशा ॥ ७ ॥
याहो याहो घट्ट धरुंया बाबांचे चरण । धरुंया बाबांचे चरण ॥
केशव विनवी सर्व जनानां जाऊंया शरण ॥ ८ ॥

## १३

आनंद झाला । आनंद झाला ॥ देव देहीं तो पाहिला ।
मग उरलें नाहीं मी तूं पण । द्वैत अद्वैताची खूण ॥ १ ॥
तत्व तें नामांत । राहूं देई मनांत ॥
ध्यास लागो त्याचा मना । मग जाई उणेपणा ॥ २ ॥
रिद्धी सिद्धी सहित आहे । गणेश–साई आदि पाहे ।
घोका घोका आदि नाम । केशव म्हणे हेंचि काम ॥

## १४

कृपेवीण देवा । जगीं ना विसांवा ॥
संसारी यातना । सहवेना ॥
भाऊ मित्र दारा । व्यर्थ हा पसारा
कुठें ना आसरा । तुझ्यावीण ॥
मागें हेंचि आतां । कृपा साईनाथा ॥
तारीं या केशवा । मायबापा ॥

संपादक

---

# शिर्डी वृत्त–

## नोव्हेंबर सन १९४८

या महिन्यांत बाहेरगांवची बरीच भक्त मंडळी श्रीसाई–समाधीचें दर्शन घेऊन गेली. अभिषेक, आर्चन, लघुरुद्र, पूजा, नैवेद्य, आरती व अन्नदान वगैरे धर्मकृत्यें नेहमींप्रमाणें झालीं. संस्थान गवई यांचीं कार्तिक शु॥ ११ व कार्तिक व॥ ११ आणि ज्ञानेश्वर पुण्यतिथीस अशीं तीन कीर्तनें झालीं.

नवल विशेषः—दिपवाळीनिमित्त दिपोत्सव, श्री समाधीस मंगलस्नान वगैरे विधी सालवादप्रमाणें झाले. श्री लक्ष्मी पूजन संस्थान मॅनेजर श्री. खडकतकर यांचे हस्तें झालें. कार्तिक शुद्ध ११ स श्री पालखीची मिरवणूक, मंगलस्नान व कीर्तन असे कार्यक्रम होते.

श्री. चंद्रकांत खरे यांनीं संगीत भजनाची हजेरी श्रीपुढें दिली.

शिर्डी येथील हवापाणी उत्तम आहे. मध्यंतरीं दोन दिवस अतिवृष्टि झाली.

# डिसेंबर सन १९४८

चालू महिन्यांत श्रीसाईबाबाचे दर्शनास बाहेरगांवची बरीच भक्तमंडळी आली होती. अभिषेक, अर्चन, लघुरुद्र, पूजा, आरती, नैवेद्य व अन्नदानें वगैरे नेहमींप्रमाणें झालें. नाताळचे सुटीमुळें या महिन्यांत गर्दी जास्त होती. बाहेरगांवचे कीर्तनकार श्री. काशिनाथबुवा नगरकर यांचीं दत्तजयंतीनिमित्त एक व एकूण तीन कीर्तनें झालीं. तसेंच श्रीनारायणबुवा टाकळीकर ( नाशिक ) यांचें एक कीर्तन झालें.

श्रीदत्तजयंतीचा उत्सव श्रींचे मंदिरांत साजरा झाला.

श्री. पिरोजबाई दस्तुर, मुंबई, श्री. मणिकराम राणे, सौ. सुमित्रा राणे, मुंबई यांनीं श्रींपुढें गायनाची हजेरी दिली.

श्री. सदाशिव श्रीधर कागलकर यांचें प्रवचन या महिन्यांत झालें.

शिर्डी येथील हवापाणी उत्तम आहे.

# जानेवारी सन १९४९

या महिन्यांत नेहमीप्रमाणें बाहेरगांवच्या भक्तांची श्रींचे दर्शनास आवक-जावक चालू होती. अभिषेक, अर्चन, लघुरुद्र, पूजा-आरती, नैवेद्य व अन्नदान नेहमींप्रमाणें झालें. संस्थान गवई यांचीं एकादशीनिमित्त दोन कीर्तनें झालीं.

श्री. ल. श्री. बोडस, नाशिकरोड, श्री. द. द. कुळकर्णी, सोलापूर, श्री. पंडित जगन्नाथबुवा सुरतकर, श्री. द्वा. कु. जगताप, पुणतांबा, रामराव कोटेकर, पुणतांबा, श्री. रं. म. जोशी, पुणतांबा, श्रीताराबाई बेलापूरकर, बेलापूर रोड, श्री. वामन प्रेमगिरी-कर या लोकांनीं या महिन्यांत श्रींचें पुढें गायनाचे कार्यक्रम केले.

शिर्डी येथील हवापाणी उत्तम आहे.

### —: विनंति :—

श्रीसाईलीलेचा वर्षारंभ जानेवारीपासून चालू होतो. या अंकाबरोबर ज्या वर्गणी-दारांची वर्गणी संपली असेल त्यांनीं आपली वर्गणी त्वरित पाठवून द्यावी, नाहींतर पुढचा प्रसिद्ध होणारा अंक पाठविला जाणार नाहीं.

संपादक

# " तथास्तु "

जीवींच्या जिवलगा ! जंजाळमय जगांत, जाणिवींचें जीवन जगव ! मोहमायेच्या महालांत अंतरंगांनीं नटलेल्या नदीला न डगमगतां 'धीर सो गंभीर' वृत्ती ठेवून स्वानंदाचें लेणें लेवून एक एक पाऊल पुढें टाकत जा। निराशेच्या निशेंत निद्रा न घेतां, निर्गुण, निराकार, निरामय अशा ॐकाराच्या मंजुळ नादस्वरानें गुंगून पायरी पायरी वर चढत जा। मद मदिरा मैथुन यांच्या संगतीनें मन मानेल असा भटकत न राहतां, सत्कर्म सद्धर्म, व सत्संगतीनें मानस सोहंवराचें शिखर गांठ। आसुरी आघोरी अविद्येच्या आहारीं न जातां सात्विक, सगुण, सोप्या अशा राजस मार्गानें जाऊन जगांत अजरामर हो !

या जीवा ! 'दिसतें तसें नसतें म्हणूनच जग फसतें'. लांडी, लबाडी, लांचलुंच यांचा सुळसुळाट सगळीकडे पसरला आहे. खऱ्याची दुनिया नाहीं, सत्याला विचारीत नाहीं आणि धर्म ध्यानीं मनीं नाहीं. सर्वत्र अंधार झाला आहे. स्वतःच्या स्वयंज्योतीनें प्रकाश पाहून आपला राजस मार्ग चोखाळ व शांति, समाधान, सहिष्णुता अंगीं बाणून दुष्ट, दुराचारी, आणि दुर्गुणी यांचा सहवास न करितां, वैश्वदेव अतिथी यांचा सत्कार कर—

देवता–प्राण–अग्नि–वंचन । वैश्वदेवान्तीं अतिथिवर्जन ।।
करुनि करिती जे पिंडपोषण । महद्दूषण त्या अशा ।।

एकदां बलराम, कृष्ण व सुदाम हे गुरु सांदिपनी यांच्या आश्रमीं सेवा करीत असतां कृष्ण व बलराम यांना लांकडें आणण्याकरितां जंगलांत पाठविलें. गुरुपत्नीनें त्यांच्या पाठोपाठ सुदामाजवळ चणे देऊन पाठविलें. व भूक लागली म्हणजे त्या दोघांना देऊन तूं खा व वर पाणी प्या. असें बजाविलें. पुढें रानांत—

कृष्ण म्हणालाः—दादा, तहान लागली रे

सुदामः—अरे कृष्णा, अनशा पोटीं पाणी पिऊं नये, थोडा वेळ माझ्या मांडीवर विसांवा घे.

परंतु चण्याची गोष्ट कांहीं नाहीं. कृष्णाचा डोळा लागलासें पाहून सुदामा चणे खाऊं लागला.

कृष्णः—दादा, काय हो खातां ? आवाज कसला करितां ?

सुदामः—कायरे खायला आहे येथें, दगड आणि माती. उलट थंडीनें दांतावर दांत आपटत आहे. विष्णु सहस्रनामसुद्धां मुखानें स्पष्ट म्हणतां येत नाहीं.

हें ऐकून,

कृष्णः—मलाहि असेंच स्वप्न पडलें कीं,

एकाची वस्तु दुजा खातां । कायरे खातोस ऐसें वदतां ।।
खाऊं काय माती तो म्हणतां ।
वाणी तथास्तुता प्रगटली ।।

दादा, हें केवळ स्वप्नच आहे बरें ! आणि ह्याच तालांत मी तुला प्रश्न केला कीं, दादा काय खातोस.

ह्याचा परिणाम सुदामाला अठराविश्वे दारिद्य भोगणें भाग पडलें.

या जीवा ! सावध हो. श्री साई–पुरुषोत्तम–श्रीकृष्णपरमात्मा–सर्व टिकाणीं उभा आहे. एखादे वेळेस असेंच कांहींच्या कांहीं करशील आणि वाणी तथास्तु होईल, मग फजीतीला पारावार नाहीं.

—संपादक

# श्री. साईबाबा शिरडी संस्थानांत

## विक्रीकरितां असलेलीं पुस्तकें

| | | किंमत<br>रु. आ. पै |
|---|---|---|
| १ | श्री साई सच्चरित्र [ मराठी ] ... ... | ७–०–० |
| २ | सच्चरित [ इंग्रजी ] ... ... | ४–०–० |
| ३ | दासगणूकृत श्रीसाईनाथ स्तवनमंजरी ... | ०–२–० |
| ४ | ,, [ अध्याय ४ था ] ... | ०–८–० |
| ५ | सगुणोपासना .... .... ... | ०–३–० |
| ६ | प्रधानकृत पुस्तक [ इंग्रजी ] .... ... | १–४–० |

वरील पुस्तकांकरितां व बाबांचे विश्वसनीय निरनिराळ्या साईंच्या फोटो वगैरेकरितां खालील पत्त्यावर लिहावें.

मॅनेजर, **शिरडी संस्थान,** मु. शिरडी, पो. रहातें, जि. **अहमदनगर** अ
श्री. त्रि. आ. वैद्य, चाचडची चाळ, वरसावा रोड, अंधेरी, **मुंबई.**

---

श्री साईबाबा शिरडी संस्थान कमिटी तर्फे
संपादक :– डॉ. के. भ. गव्हाणकर यांनीं, काळाचौकी रोड,
मुंबई १२ येथें प्रसिद्ध केलें.

मुद्रक :– के. एन. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, ल्यूडेक्स बिल्डिंग,
त्रिभुवन रोड, मुंबई ४.

# " श्री साईलीला " त्रैमासिक



# श्री सा ई ली ला

## श्री साईनाथ प्रसन्न



गोदावर्याः प्रवाहो विलसति यदुदक्पार्श्वतो योजनैकम्
प्रादूर्भूत्वाऽत्मभूत्या निशजनितमहे शीलधिक्षेत्रधाम्नि ।
सर्वज्ञातीयवृंदैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः ।
पूर्णब्रह्मैव साक्षाद्विजयति भुवनं पावयन्साइनाथः ॥

वर्ष २६ ] त्रैमासिक—एप्रिल, मे, जून १९४९ [ अंक २ रा

## —: संपादकीय :—

**"जगाच्या कल्याणा संतांच्या विभुति ॥ देह कष्टविती उपकारें ॥"**

आधुनिक कालांत ज्या संतांनीं आपला देह झिजवून आपणा सर्वांना कायमचे ऋणी करून ठेवलें आहे, त्या श्रीसद्गुरु साईनाथ माऊलीचे, अज्ञ भोळ्या व भाविक लोकांना महत्त्व पटविण्याकरितां '**साईलीला त्रैमासिक**' सुरू झालें आहे. आज नुसता त्यांच्या नामांचा उच्चार केला असतां आलेलें संकट टळून निर्विघ्नपणें कामें होतात व मनाला एकप्रकारचा स्वर्गीय आनंद प्राप्त होतो. अशा तऱ्हेचे अनुभव आपणां बहुतेकांना पदोपदीं येत आहेत.

संत, साधु म्हणजे काय चीज आहे; हें साईबाबांनीं आपल्या आचरणानें सर्व भक्तगणांना दाखवून दिलें आहे. बाबा आज अदृष्य स्थितींत असले तरी त्यांनीं आपणांस भक्तिमार्गानें, संसाररूपी भवसागर तरून जाण्यास खरें मार्गदर्शन केलें आहे व करीत आहेत.

कलियुगांत नाना तऱ्हेचे लोक आहेत त्यांत विशेष अघोरी विद्या संपादन करून, सिद्धींना वश करून लोकांवर छाप पाडून आपलें स्वतःचें स्तोम साईबाबांच्या नांवाखालीं

माजविणारे आहेत. त्यांच्या नादीं लागणें म्हणजे दिव्यावर पतंगानें झडप घालण्या-सारखें आहे. 'दुनिया झुकती है झुकानेवाला चाहिये' आजच्या धकाधकीच्या काळांत लोकांच्या मनांची स्थिति फार केविलवाणी झाली आहे. सामान्य जनता दारिद्र्यानें पिडली आहे. अशा भांबावलेल्या मनःस्थितींतून मार्ग काढण्याकरितां जो तो वाटेल त्या ज्योतिषाकडे, साधूकडे, वैराग्याकडे, जादूटोणा करण्याकडे अगर वाऱ्याकडे (अंगांत वारें संचार करणें) धांव मारून असेल नसेल तो पैसा खर्च करून दुःखांत भर टाकीत असतो.

'जे कां रंजले गांजले त्यांसी म्हणे जो आपुले ।। तोची साधु ओळखावा ।। देव तेथेंची जाणावा ।।' खऱ्या साधूचा दरवाजा पीडितांना सदा मोकळा असतो, नाहींतर अलिकडील साधूंच्या कंपौंडच्या दरवाज्याला भलीं मोठीं कुलपें लागतात. फक्त श्रीमंत लोकांना असल्या साधूंचा दरवाजा मोकळा असतो.

श्री साईबाबांच्या वेळेस हजारो माणसें, लांबलांबचा प्रवास करून शिरडीला, बाबांच्या दर्शनाला येत. व बाबांनीं सर्वांना आशीर्वाद द्यावा, उदी द्यावी, त्यांनीं कधींहि कुलपें घातलीं नाहींत. त्यांच्याकडे गेलेला माणूस कधींही आंबट तोंड करून परत आला नाहीं, उलट हंसत मुखानें गोड तोंड करून घरीं येत. आजसुद्धां गोड अनुभव येत आहेत. बाबांनीं लावलेल्या 'साईफुलांचा' वास जगांत चोहोंबाजूस सारखा दुम-दुमत आहे. तो सतत विकसित राहावा व अव्याहत टीकावा म्हणून त्या साईझाडास--(साईलिलांस) आपण सर्वांनीं थोडें थोडें पाणी नको कां सिंचन करावयाला ?

गुलाबाच्या फुलाला कांटे असतात, केतकीच्या बुंदांत सापाचें वाटोळें (वेटोळें) असतें, चंदनाखालीं सुद्धां नाग डुलत असतो, तसेंच संतांच्या भोंवतींसुद्धां द्वेशी, दुष्ट, कुचाळ निंदक असे दुष्ट वृत्तीचे व अघोरी विद्येला वश करून घेतलेले काळसर्प पुष्कळ असतात. त्यांच्या डोक्यावर पाय ठेवून त्यांना ठेंचून, अविरत व मंदमंद वाहणाऱ्या 'साई फुलाच्या' वासानें मोहित होणाऱ्या भोळ्या भाविक जनांना धीर द्यावयाला नको का ?

नरदेहाची प्राप्ती एकदांच होते. त्याचा उपयोग चांगल्याप्रकारें झाला नाहीं तर जन्मदात्या प्रभूला काय वाटेल ? त्याकरितां खऱ्या साधूची, संताची, सत्पुरुषाची, आपल्याला गरज असते, कारण ते स्वतः अनुभवानें सिद्ध असतात. नुसती पोथ्या-पुराणें, शास्त्र अगर धार्मिक ग्रंथ वाचून फक्त शाब्दिक अर्थ समजेल, पण खरें मर्म किंवा रहस्य खऱ्या मार्गदर्शकावांचून (सद्गुरु) समजणार नाहीं.

कोणी एक श्रीमान गृहस्थ होता, त्याच्या मनांत असें आलें कीं, आपतकालीं अगर माझ्या पश्चात् संततीला उपयोगी पडावें म्हणून कांहीं द्रव्य आपण गुप्त ठिकाणीं दडवून ठवावें, त्याप्रमाणें त्यानें आपल्या स्वतःच्या मालकीच्या सिद्धेश्वराच्या देवळाच्या शिखरावरील घुमटाच्या पोकळींत कोणाच्याहि दृष्टीस पडणार नाहीं अशा ठिकाणीं पुष्कळ द्रव्य नेऊन ठेवलें; व त्या संबंधानें एका निराळया वहींत नोंद करून ठेवली.

'संवत १७२५ च्या वर्षी उत्तरायणांत चैत्र महिन्याच्या शुक्ल पक्षांतील अष्टमीस दिवसा १२ वाजतां सिद्धेश्वराच्या देवळाच्या शिखरावरील घुमटांत (१५) पंधरा लाख रुपयांच्या सोन्याच्या मोहरा ठेवल्या आहेत. जेव्हां काम लागेल तेव्हां त्या काढाव्या' व ती वही गुप्त ठिकाणीं ठेवली. पुढें बऱ्याच वर्षांनीं तो गृहस्थ आपल्या परिवारासह यात्रा करण्यास निघाला. प्रवासांत असतांना कॉलेराची साथ (पटकी) उद्भवली व त्यांत तो सांपडून मरण पावला. कलांतरानें त्याचा मुलगा मोठा झाला. व बापाच्या धंद्याकडे लक्ष घालूं लागला. त्या धंद्यांत त्याला वारंवार खोट खावी लागे, धंदा नुकसानींत असल्यामुळें तो कर्जबाजारी झाला. त्याचे धनको आपल्या पैशाची मागणी करून त्यास दुःख देऊं लागले. एके दिवशीं तो बापाच्या चोपड्या तपासीत असतां ती गुप्त ठेवलेली वही त्याच्या हाताशीं लागली, त्यांतील मजकूर वाचून त्याला अत्यंत आनंद झाला, लगेच त्यानें गवंडी वगैरे आणून तो घुमट खालीं उतरविला, परंतु तपासा अंतीं त्यांत कांहींच सांपडलें नाहीं. म्हणून ती वही त्यानें खिन्न मनानें परत वाचली, व आपल्या दोनतीन मित्रांना पण दाखविली.

'देवळाच्या शिखराच्या घुमटांत धन ठेवलें आहे' असाच सर्वांनीं निष्कर्ष काढला, व ज्यानें त्यानें आपल्या बुद्धीच्या मगदुराप्रमाणें अर्थ लावण्यास सुरवात केली कोणी म्हणावें हीं रक्कम खोटी खर्चीं घातली असावी, तर कोणी म्हणावें सोन्याच्या मोहरा कोणापासून तरी विकत घेतल्या असतील आणि त्या रकमेइतकी रक्कम कोणत्या खात्यास खर्चीं घातली असावी, शंका कुशंका अनेकांच्या अनेक निघाल्या, एकानें म्हणावें त्या चोपड्या नीट वाचल्या नाहींस, नीट वाचून प्रहा ! वगैरे वगैरे. आपला बाप असें खोटें कृत्य कदापि करणार नाहीं.

आपल्याला त्याचा अर्थ होत नाहीं हेंच खरें; असें मनीं धरून तो एका वृद्ध नातेवाईकाकडे गेला व आजोबा ह्या चोपडींत लिहिल्याप्रमाणें देवळाचा घुमट मी द्रव्यासाठीं उतरवला व सर्व लोकांत, बापानें देऊळ बांधवलें व चिरंजीव शहाणे निघाले त्यांनीं तें फोडून टाकलें. असा माझ्यासंबंधीं दुर्लौकिक पसरला आहे. त्यामुळें मला अतिशय वाईट वाटत आहे तरी मला ह्यांतून वांचवा. बुद्धिमान वृद्ध मनुष्याच्या मनांत दया उत्पन्न झाली आणि तो म्हणाला, 'अरे बाळा, तूं कांहीं काळजी करूं नकोस. तुझ्या वहींत जें कांहीं लिहून ठेवलेलें आहे तें सर्व खरें आहे व त्याप्रमाणें तुला द्रव्य मिळेल. पण दरम्यान तूं हा घुमट अगोदर पूर्वीप्रमाणें बांधून तयार कर. त्याला खर्चाला लागणारा पैसा माझ्याकडून घेऊन जा आणि तो तयार झाल्यावर चैत्र शुद्ध ८ मीच्या दिवशीं सकाळीं मला येऊन भेट. त्याप्रमाणें तो घुमट पूर्ववत बांधून तयार केला.

चैत्र शुद्ध ८ मीच्या दिवशीं तो बुद्धिमान वृद्ध गृहस्थ आला व दुपारीं १२ वाजण्याच्या सुमारास म्हणाला कीं, 'चल आपण बागेंत जाऊन सिद्धेश्वराचें दर्शन घेऊं' त्याप्रमाणें दोघांनीं महादेवाचें दर्शन घेतलें व महादेवास प्रदक्षिणा घालीत असतां त्या घुमटाची छाया खालीं जमिनीवर पडली होती ती आजोबांनीं मुलास दाखवून म्हटलें, 'बाळा, देवळाचा घुमट याला म्हणतात' तर मग ही जागा खण. त्याप्रमाणें ती जागा

खणली तों त्यांत १५ लाख रुपयांच्या सोन्याच्या मोहरा दृष्टीस पडल्या. तात्पर्य काय कीं, ज्यावेळीं लिहिणाराचा अभिप्राय बरोबर रीतीनें समजणारा बुद्धिमान मनुष्य त्या मुलास मिळाला तेव्हांच त्याला द्रव्याची प्राप्ति झाली. **तद्वत् देहरूप घुमटांत सच्चिदानंद आत्मस्वरूप द्रव्य आहे व त्याची नोंद श्रुतिस्मृति शास्त्ररूप वहीत करूनही ठेविली आहे; असें जरी खरें आहे तरी अनुभवानें सिद्ध झालेल्या सद्गुरूच्या द्वारें शास्त्राचें रहस्य समजावून घेतल्याशिवाय आत्मस्वरूप धनाची प्राप्ति कदापीहि होणार नाहीं.**

जो स्वधर्माचा त्याग करीत नाहीं, ज्याच्या ठायीं सदा सर्वदा समदृष्टी, वैराग्य, शांति, दांति, धैर्य, दया, अदंभ, अमान, अक्रोध, क्षमा, अद्वेष शुचित्व इत्यादि शुभगुण वेदार्थ जाणणारा व ब्रह्मस्वरूपाच्या ठिकाणीं निष्ठा धारण करणारा. साधू, सद्गुरु व सत्पुरुष होय. माझ्या पाहाण्यांत फक्त श्रीसद्गुरु साईबाबा आहेत व त्यांचें शिष्यत्व आमच्यासारख्या सामान्य माणसाला येणें योग्य होईल काय ?

श्री साईबाबांनीं आपल्यामागें शिष्यपरंपरा केली नाहीं. त्यांनीं कोणालाहि मंत्रतंत्र दिले नाहींत तर आपल्या आचरणानें सर्वांना भोळी भावडी भक्ति शिकवली. आज मितीस त्यांचे शिष्य म्हणून जो तो मिरवतो; पण तें निव्वळ थोतांड आहे. कारण आम्ही सर्व त्यांचे भक्त आहोंत. शिष्य नाहींत.

वाटेल त्या भूल थापांना बळी पडूं नका. श्रीसाई बाबा—साईलीला—परमात्मा समजून प्रत्येकानें भक्तिभावानें आंकळून आपलासा करून घ्यावा. अशारीतीनें एक-निष्ठेनें, सबुरी व श्रद्धा ठेवून श्रीबाबांची सेवा केली तर तुम्हाला त्यांच्या सान्निध्याचे गोड गोड अनुभव चाखावयास मिळतील. अशा रीतीचे आलेले अनुभव आपण साई-लीलेंत प्रसिद्ध करून आपल्या बांधवांना सद्गुरुमाऊलीच्या प्रभावाचें महत्त्व पटवून द्या. हीच या अज्ञ संपादकाची आपल्या सर्वांच्या चरणीं नम्र विनंति आहे.

**संपादक.**

## ॥ श्रीसद्गुरु साईनाथ स्तोत्र ॥

नं. १

नमो साइनाथं शिवं शान्त रूपम् । सदा सर्वसिद्धि प्रदातृ स्वरूपम् ॥
विभूतिः सताम् कालशक्ति स्वरूपम् । नमस्ते जगत्तारणं श्रीसाइनाथम् ॥ १ ॥
नमस्ते शिवं सानुकम्पम् शरण्यम् । नमस्ते जगद्व्यापकं साइनाथम् ॥
नमस्ते जगद्वंद्य पादारविंदम् । नमस्ते जगत्तारणं श्रीसाइनाथम् ॥ २ ॥
नमस्ते जगच्चिन्त्य मानस्वरूपम् । नमस्ते महायोग विज्ञानरूपम् ॥
नमस्ते नमस्ते महानन्द रूपम् । नमस्ते जगत्तारणं श्रीसाइनाथम् ॥ ३ ॥
अनाथस्य दीनस्य तृष्णा तुरस्य । भयार्तस्य भीतस्य बद्धस्य जंतोः ॥
त्वमेकं शरण्यं वरेण्यं प्रपद्ये । नमस्ते सदानन्द श्रीसाइनाथम् ॥ ४ ॥
विपत्तौ गृहे दारुणे शत्रुमध्यें । जले संकटे राजगेहे प्रवासे ॥
सदाभक्त रक्षार्थ सज्जं सुनित्यम् । श्रीसाइनाथं शरणं प्रपद्ये ॥ ५ ॥

अपारे महादुस्त रत्यन्तघोरे । निपतत्सागरे मज्जतां देहभाजां ॥
त्वमेका गतिर्देव भक्तानुकम्पम् । नमस्ते जगत्तारणं श्रीसाइनाथाम् ॥ ६ ॥
नमो साइनाथं परब्रह्म रूपम् । नमो साइनाथं जगत्राण हेतुम् ॥
अपार संसार समुद्रमध्यें । मांपातु साई कृपया कटाक्षम् ॥ ७ ॥
नमस्ते प्रभो क्षेमकल्याण रूपम् । गृहीतानुकम्पा दया हेतु रूपम् ॥
सदाभक्त कार्यार्थ मनुर्देह धारी । श्री साइनाथं शरणं प्रपद्ये ॥ ८ ॥

पद्मनाभ कृतम् स्तोत्रं, आपदुद्धार मष्टकम् ॥
त्रिसंध्यं एक संध्यंवा, पठना देव संकटात् ॥
मुच्यते नात्र संदेहो, भुविस्वर्गे महीतले ॥
साइनाथ कृपा शक्त्या, भक्त श्रेष्ठो भविष्यति ॥ ९ ॥
[ इति श्रीसाइनाथ स्तोत्रं श्रीसाइनाथार्पणमस्तु ]

**पंडीत पद्मनाभ पालये शास्त्री**

कृत.

दादर.

## ॥ श्रीसद्गुरु साईबाबांचे स्तोत्र ॥

नं. २

ॐ नमो भगवते परब्रह्म स्वरूपिणे । सच्चिदानंद रूपाय, श्रीसाइनाथ नमोस्तुते ॥ १ ॥
ॐ नमो श्रीसद्गुरु परब्रह्म साइनाथम् । अखण्डं निर्गुणं वन्दे, श्रीसाइनाथ नमोस्तुते ॥२॥
सुरेशं वंदितं देवं पूर्णब्रह्म सनातनम् । हरिहरात्मकं दिव्यं, श्रीसाइनाथ नमोस्तुते ॥ ३ ॥
भूतेशं ब्रह्मलोकेशं शुभ्र कौपीन धारिणम् । शिलाखण्ड स्थितं ब्रह्मं, श्रीसाइनाथ नमोस्तुते ॥४॥
निर्मलं शामवर्णं च सुन्दरं भाल शोभितम् । सुलोचनं विशालाक्षं, श्रीसाइनाथ नमोस्तुते ॥५॥
शुभ्र रोमांकितं शीर्षं पट्टदूकूल ग्रंथिभिः । मण्डितं मस्तकं शान्तं, श्रीसाइनाथ नमोस्तुते ॥ ६ ॥
शान्तं स्वानंद स्वरूपम् धूम्रवन्हि समायुतम् । प्रसन्न वदनं श्रीशं, श्रीसाइनाथ नमोस्तुते ॥ ७ ॥
सदायोगी सदात्यागी बाललीला पिशाच्चवत् । क्रोध कृपा विरोधेण, भक्ताभिष्ट फलप्रद ॥ ८ ॥
संसारदुःख निमग्नानां आर्तानां सुखदायकम् । लीला विग्रह रूपाय, श्रीसाइनाथ नमोस्तुते ॥९॥
इदं स्तोत्रं महद्दिव्यं सर्वरक्षा करं नृणां । आधिव्याधि हरं श्रेष्ठं, इष्ट सिद्धि प्रदायकम् ॥ १० ॥
त्रिकालमेक कालं वा पठनं सर्व साधकम् । पद्मनाभ कृतं स्तोत्रं, श्रीसाइनाथ समर्पितम् ॥११॥

श्रुत्वा स्तोत्रं साइनाथं प्रसन्नं वरदायिनम् ।
योमां स्तौति नित्यं भक्ति श्रद्धा समन्वितम् ॥
तस्य सर्वे कार्याणि सिद्धिर्भवति न संशयः ॥ १२ ॥
[ इति श्री साइनाथ स्तोत्रं श्री साइनाथार्पणमस्तु ]

**पंडीत पद्मनाभ पालये शास्त्री**

कृत.

दादर.

# ' प्रासादिक भजन '

## नाम

(१)

नाम तुझें बहु गोड ॥ साई ॥
देई चरणाची जोड ॥ साई ॥
' मरा ' म्हणतां ' राम ' प्रगटला ।
रामायण तो लिहिता झाला ।
वाल्या कोळी वाल्मीकी झाला ।
प्रभाव नामाचा वाढविला ।
दे नामाची मोट ॥ साई ॥
नाम मात्रा प्रातःकाळीं ।
उठतां बसतां निजता घ्यावी ।
अहर्नीश ती संनिध ठेवी ।
शांकिणी डांकिणी दूर पळवी ।
नाम गांठ ती सोड ॥ साई ॥
नामें तरिती तुकया गाथा ।
नामाच्या त्या अगाध वार्ता ।
दास केशव काय वर्णीता ।
घ्या नामाची झोड ॥ साई ॥

## रुपक

(२)

नयम मनोहर सगुण साजिरी मूर्ती विटेवरी ।
पुंडलिकें उभी केली । चंद्रेच्या तीरीं ॥ १ ॥
कांळि सांवळि पाषाणाची । मूर्ती सुंदर ।
भावा पोटीं भासे भक्तां । सजीव साकार ॥ २ ॥
कृष्ण सांवळा रमामाधव । रुक्मीणीपती ।
तिष्ठत उभा पंढरपूरी । भक्तांच्यासाठीं ॥ ३ ॥
पाषाणाची मूर्ती गोजिरी । मानूं नका हृदयीं ।
आत्मभावानें पहा । कशी दिसे नयनीं ॥ ४ ॥

जळीं स्थळीं पाषाणीं भरला । उरला तो देव
रिता ठाव आहे कोठें । पुसे केशव ॥ ५ ॥

( ३ )

साई तुझें रूप । दिसो दे नयनीं ।
उमटो भाव मनीं । सर्व काळ ॥
गोरें गोरें पान । सुंदर मोहक
पाहूं दे तें मूख । सदोदित ॥
नाक कान ओंठ । गुलाबी ते गाल ।
मिशा दाढी बाल । शुभ्र असे ।
नयन मनोहर । भालीं चंद्राकार ।
गंध तें झळाळे । केशराचें ॥
बांधुनीया फडका । स्वच्छ शुभ्र डोई ।
शोभे तो मुकूट । साई शिरीं ॥
फडक्याचा आंबाडा । रुळे पाठीवरी ।
ज्ञानाची मोटली । परी असे ॥
अज्ञान जाळूनी । ज्ञान धूर सोडी ।
तमाखू चिलीम । ओढूनियां ॥
ज्ञानामृतें भरली । काळी ती चिलीम ।
हातीं देई मग । अज्ञ जनां ॥
दया क्षमा शांती । नांदे तव नयनीं ।
प्रेमें मजकडे । पाहीं जरा ॥
सदा सर्वकाळ । हांसत मुखानें ।
माझ्या संगे बोल । कांहीं तरी ॥
गोजीरे गोमटें । हेंची तुझें रूप
केशवा लोचनीं । सदा राहो ॥

( ४ )

सुंदर तें रूप वसें शिर्दीत ।
कठड्यावरी कर ठेवूनीयां ।
शुभ्र कफनी अंगी डोईस फडका ।
ध्यान हेंची हृदयीं धरी आतां ।